सुविचार
सबको सम्मान देने वाला व्यक्ति सदा स्वमान में रहता है ।
(ब्रह्मकुमारीज)

विश्वसनीय बातम्यांचे एकमेश वृत्तपत्र
दैनिक यशवंत

✦लातूर/धाराशीव/बीड/नांदेड ✦/मंगळवार दि. १९ मार्च २०२४✦वर्ष ५२ वे✦अंक-१२५ ✦पृष्ठे८✦किंमत १रुपया ✦RNINO.39924/83 ✦OMD-426/2020-22✦

# सांगलीवरुन महाविकास आघाडीत जुंपली



मुंबई (प्रतिनिधी) : काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या शिवाजी पार्कवरील सभेत महाविकास आघाडीच्या नेत्यांनी भाजपाचा एकदिलाने मुकाबला करण्याचा निर्धार केला असला तरी राज्यातील महाविकास आघाडीत मात्र जागावाटपावरून धुसफूस सुरूच आहे. जागावाटपाचा अंतिम निर्णय होण्यापूर्वीच शिवसेनेच्या ठाकरे गटाने सांगलीची जागा आपण लढवणार असल्याचे जाहीर केले आहे. काँग्रेसने याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त करताना, सांगली आम्हीच लढविणार. विशाल पाटील यांची उमेदवारीही निश्चित करण्यात आली असल्याचे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी सांगितले.

पक्षाचे दोन तृतीयांश आमदार, खासदार सोडून गेल्यामुळे शिवसेना (उद्धव ठाकरे) व राष्ट्रवादी काँग्रेस ( शरद पवार) हे दोन्ही पक्ष कमकुवत झाले असले तरी त्यांच्याकडे सक्षम नेतृत्व असल्यामुळे जागावाटपात त्यांचाच वरचष्मा आहे. त्यांच्या मागे काँग्रेसची फरफट होत असल्याबद्दल काँग्रेसमध्ये नाराजी होतीच. नाना पटोले आणि बाळासाहेब थोरात आक्रमक भूमिका घेत नाहीत, अशी तक्रार काही आमदारांनी आधीही केली होती. त्यातच शिवसेनेने सांगलीची जागा आम्हीच लढवणार असल्याचे सांगत दुहेरी महाराष्ट्र केसरी चंद्रहार पाटील यांची उमेदवारीही जवळपास नक्की केली आहे.

हिंगोलीची जागाही आम्हीच लढविणार असल्याचे खा. संजय राऊत यांनी स्पष्ट केले आहे. याबद्दल नाराजी व्यक्त करताना सांगलीची जागा कोणत्याही परिस्थितीत काँग्रेसला मिळालीच पाहिजे. त्यासाठी टोकाची भूमिका घ्यावी लागली तरी चालेल, असे काँग्रेस नेते व माजी मंत्री विश्र्वजित कदम यांनी सांगितले. प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनीही सांगली काँग्रेसकडेच राहील, असे सांगितले.

# ६ काँग्रेस आमदारांच्या निलंबन स्थगितीस सुप्रीम कोर्टाचा नकार





नवी दिल्ली : नुकत्याच झालेल्या राज्यसभा निवडणुकीत क्रॉस वोटिंग करणा-या काँग्रेसच्या ६ आमदारांचे हिमाचल प्रदेश विधानसभा अध्यक्षांनी निलंबन केले होते.

या विरोधात सर्वोच्च न्यायालयात धाव घेत या बंडखोर आमदरांनी निलंबनावर स्थिगिती आणण्याची मागणी केली होती. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने स्थिगिती देण्यास नकार दिला आहे. दरम्यान न्यायमूर्ती संजीव खन्ना आणि दिपंकर दत्ता यांच्या खंडपीठाने हिमाचल प्रदेशच्या विधानसभा अध्यक्ष कुलदीप सिंह पठाणिया यांना नोटीस पाठवत या प्रकरणी त्यांचे मत मागविले आहे.

यावेळी खंडपीठाने असेही सांगितले की, जोपर्यंत हे प्रकरण प्रलंबित आहे, तोपर्यंत काँग्रेसच्या या ६ बंडखोर आमदारांना विधानसभेच्या कामकाजात आणि कोणत्याही प्रकारच्या मतदान प्रक्रियेत सहभागी होता येणार नाही. या प्रकरणी आता पुढची सुनावनी ६ मे रोजी ठेवली आहे. दरम्यान निवडणूक आयोगाने या सहा जागांवर पोटनिवडणूक जाहीर केली आहे. त्यासाठी अर्ज भरण्याची प्रक्रिया ७ मे रोजी होणार आहे.

(पान २ वर)

# विकसित भारतासाठी ४०० पार हवे

बंगळूरू : विकसित भारतासाठी ४०० पार, विकसित कर्नाटकासाठी ४०० पार, गरिबी कमी करण्यासाठी ४०० पार, दहशतवादावर प्रहार करण्यासाठी ४०० पार, भ्रष्टाचा-यांवर कारवाईसाठी ४०० पार, शेतकरी समृद्ध करण्यासाठी ४०० पार, युवकांना नव्या संधीसाठी ४०० पार, अबकी बार ४०० पार असा विश्र्वास पंतप्रधान नरेंद्र मोदींनी कर्नाटकात दिला आहे. याठिकाणी सभेला संबोधित करताना मोदींनी विरोधकांवर निशाणा साधला.



पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, तुमचे हे प्रेम आणि आपला आशीर्वाद, कर्नाटकच्या कानाकोपऱ्यात भाजपाला मिळालेली ही जनसमर्थनाची लाट, ही ऊर्जा, हे दृश्यच जणू काही संपूर्ण मैदान ऊर्जेने भरले आहे. हे पाहून दुसरीकडे, भ्रष्टाचार आणि द्वेषाच्या राजकारणात बुडलेल्या इंडिया आघाडीची झोप उडाली असावी. काही महिन्यातच काँग्रेस सरकारविरोधात कर्नाटकात लोकांचा रोष पाहायला मिळत आहे. एनडीएचे खासदार केंद्राच्या योजना चांगल्यारितीने लोकांपर्यंत पोहचवण्यासाठी मदत करतील असे त्यांनी सांगितले.

तसेच मुंबईच्या शिवाजी पार्क सभेतून शक्ती नष्ट करण्याची घोषणा करण्यात आली. बाळासाहेब ठाकरे यांच्या आत्म्याला किती वेदना झाल्या असतील. नारीशक्ती, त्यांचा आशीर्वादच माझे सर्वात मोठे कवच आहे. इंडिया आघाडीला ही शक्ती नष्ट करायची आहे. भारत मातेच्या वाढल्या प्राबल्याचा त्यांना राग आहे. शक्तीवर वार म्हणजे महिला, मुली आणि भारत मातेवर वार आहे असेही पंतप्रधान मोदींनी म्हटले.

दरम्यान, लोकसभा निवडणुकीच्या तारखा घोषित झाल्यानंतर पंतप्रधान मोदींपासून अन्य विरोधी पक्षही तयारीला (पान २ वर)

# उबाठा च्या गटाने माफी मागितली पाहिजे

मुंबई : शिवाजी पार्कवर झालेली इंडिया आघाडी ची सभा ही फ्लॉप शो होता. त्यामुळे इतर राज्यातून तडीपार झालेली लोक एकत्र आली होती. त्यामुळे उबाठा च्या गटाने माफी मागितले पाहिजे, अशी टीका मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. राज्यात महायुती ४५ चा पार करणार, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

सीएम शिंदे यांनी शिवाजी पार्कवर झालेल्या इंडिया आघाडीच्या सभेवर जोरदार टीका केली. यावेळी बोलताना ते म्हणाले की, त्यांच्याकडे पंतप्रधानपदाचा चेहरा आहे का? एकमेकांकडे निराशाने पाहत होते. ते पुढे म्हणाले की, इतर राज्यातून तडीपार झालेली एकत्र आली होती. मग मोदीजींना ही लोक कसे तडीपार करतील? गेल्या ५० वर्षात काँग्रेसला जे जमले नाही ते मोदीजींनी दहा वर्षात करून दाखवले. अर्थव्यवस्था तिस-या क्रमांकावर आणण्याचा प्रयत्न आहे. (पान २ वर)






# आम्हाला बोलायला लावू नका!

नवी दिल्ली : एससीबीएचे अध्यक्ष आणि वरिष्ठ वकील अधीष अग्रवाल यांना सुप्रीम कोर्टाने फटकारले असून अधीष अग्रवाल यांनी सुप्रीम कोर्टाने निवडणूक रोख्यांसंदर्भात दिलेल्या निकालावर आक्षेप घेतला होता. यासंदर्भात त्यांनी आधी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू याना पत्र लिहिले होते. त्यानंतर त्यांनी देशाचे सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांना देखील पत्र लिहिले होते.सरन्यायाधीश म्हणालेत की, तुम्ही आम्हाला निवडणूक रोख्यांसंदर्भात घेतलेल्या निकालाचा पुनर्विचार करण्यास सांगत आहात. हे सर्व काही प्रसिद्धसाठी सुरु असल्याचे आम्हाला दिसत आहे. त्यामुळे यात लक्ष घालावे असे आम्हाला वाटत नाही.





तुम्ही एक वरिष्ठ वकील आणि एससीबीएचे अध्यक्ष आहात. तुम्ही पत्र लिहून माझ्या सू मोटोच्या अधिकारांना आव्हान दिले आहे. हे सर्व प्रसिद्धीसाठी सुरु आहे. त्यामुळे आम्ही यात लक्ष घालणार नाही. मला आणखी काही बोलायला लावू नका. कारण, ते सन्मानजनक नसेल असे सरन्यायाधीश चंद्रचूड यांनी अग्रवाल यांना म्हटले आहे. अधीष अग्रवाल यांनी यापूर्वी द्रौपदी मुर्मू यांना पत्र लिहिले होते. सुप्रीम कोर्टाचा निवडणूक रोख्यांसंदर्भात देण्यात आलेला निर्णय अयोग्य आहे. त्यामुळे त्यांच्या निर्णयाला लागू न करण्याचा आदेश देण्यात यावा, अशी मागणी अग्रवाल यांनी राष्ट्रपतींकडे केली होती. त्यांची ही मागणी मुर्मू यांनी स्पष्ट शब्दांत नाकारली होती. तसेच, अग्रवाल यांच्या विचारांवर टीका केली होती सुप्रीम कोर्टाच्या अधिकारांना कमकूवत करण्याचा हा प्रयत्न आहे, असे त्या म्हणाल्या होत्या.

निवडणूक रोखे असंविधानिक (पान २ वर)

# वंचितच्या निर्णयावर महाविकास आघाडीचे जागावाटप अवलंबून

मुंबई : लोकसभा निवडणूक जाहीर झाल्याने महाविकास आघाडीकडून जागावाटपावर अंतिम निर्णय लवकरच जाहीर होण्याची शक्यता आहे. वंचित बहुजन आघाडीकडून येणारे प्रस्ताव आणि अटी व शर्थीमुळे हैराण झालेल्या महाविकास आघाडीने अखेर वंचित बहुजन आघाडीशिवाय जागावाटपाचा फॉर्म्युला जवळपास निश्चित केला आहे. त्यामुळे वंचितकडून सकारात्मक प्रतिसाद न मिळाल्यास लवकरच महाविकास आघाडीचे जागावाटप निश्चित होऊन जाहीर केले जाण्याची शक्यता आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, महाविकास आघाडीने जागावाटपावर जवळपास शिकामोर्तब केले आहे. त्यानुसार आता महाविकास आघाडीमध्ये ठाकरे गट राज्यात २२ जागा लढवणार असून शरद पवार गट १० जागांवर, तर काँग्रेस १६ जागांवर निवडणूक लढवणार आहे.

त्यामुळे ठाकरे गटाकडून हातकणंगलेची जागा राजू शेट्टी यांना सोडली जाऊ शकते. महाविकास आघाडी राजू शेट्टी यांना बाहेरून पाठिंबा देईल, अशी चिन्हे आहेत. दुसरीकडे, सांगली जागेवरून काँग्रेस आणि ठाकरे गटात रस्सीखेच सुरु आहे.

दरम्यान, वंचित बहुजन आघाडीकडून महाविकास आघाडीकडे तब्बल १७ जागांचा प्रस्ताव आल्याने तो अशक्यप्राय असल्याने तो अमान्य करण्यात आला आहे. वंचित बहुजन आघाडीला महाविकास आघाडीकडून चार जागांचा प्रस्ताव देण्यात आला आहे. या प्रस्तावाशिवाय अन्य कोणताही नविन प्रस्ताव महाविकास आघाडी देणार नसून वंचितने निर्णय घेतल्यानंतर जागा कोणत्या द्यायच्या याचा पुढील विचार केला जाईल, यावर महाविकास आघाडीच्या नेत्यांनी एकमत केले आहे.

वंचित बहुजन आघाडीला महाविकास आघाडीने अजूनही चर्चेचे दरवाजे खुले ठेवले असले, तरी प्रकाश आंबेडकर यांची भूमिका पाहता महाविकास आघाडीत ते खरंच येत आहेत की न येण्यासाठी कारणांची मालिका उपस्थित करत आहेत? अशी सुद्धा राजकीय वर्तुळामध्ये चर्चा आहे. (पान २ वर)

# अपहरण केलेल्या जहाजातील १७ क्रू मेंबर्सची सुटका

नवी दिल्ली : ११० दिवसांपेक्षा अधिक वेळ एडनच्या आखातात हायजॅक केलेल्या व्यापारी जहाज रुएनला वाचविण्याचे ऑपरेशन भारतीय नौदलाने पूर्ण केले आहे. हे ऑपरेशन भारतीय किनारपट्टीपासून २६०० किमी इतक्या दूर अंतरावर करण्यात आले. या ऑपरेशनमध्ये ३५ सोमालियन समुद्री चाच्यांना (लुटेरे) ताब्यात घेण्यात आले असून १७ क्रू मेंबर्सना सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आले. या कारवाईतून हिंद महासागरात शांतता आणि स्थिरता मजबूत करण्याचा आणि चाचेगिरीचा प्रयत्न हाणून पाडण्याचा नौदलाचा निर्धार दिसून येतो. या जहाजात अंदाजे ३७ हजार टन माल भरलेला असून त्याची किंमत १० लाख अमेरिकन डॉलर (८.२ कोटी रुपये) आहे.





या जहाजाला भारतात सुरक्षितपणे आणण्यात येणार आहे. येमेनच्या हौथी बंडखोरांकडून लाल समुद्रातील मालवाहू जहाजांवर वाढत्या हल्ल्यांनंतर नौदलाने जलमार्गांवर लक्ष ठेवण्यासाठी १० हून अधिक युद्धनौका तैनात केल्या आहेत. आयएनएस कोलकाता, आयएनएस सुभद्रा आणि सी गार्डियन ड्रोन या ऑपरेशनसाठी तैनात करण्यात आले होते. ऑपरेशनसाठी सी-१७ विमानातून खास मार्कोस कमांडोज उतरविण्यात आले होते. अमेरिकन सैन्याच्या सेंट्रल कमांडने सांगितले की, त्यांनी हौथी नियंत्रित प्रदेशात पाच ड्रोन नौका आणि एक ड्रोन नष्ट केले. ही आतापर्यंतची सर्वांत मोठी कारवाई आहे.

भारतीय युद्धनौकेवर गोळीबार

नौदलाने सांगितले की, आयएनएस कोलकाताने बुधवारी सकाळी रुएनला रोखले आणि ड्रोनद्वारे जहाजावर असलेल्या सशस्त्र चाच्यांच्या उपस्थितीची खात्री केली. चाच्यांनी ड्रोन खाली पाडले आणि भारतीय नौदलाच्या युद्धनौकेवर गोळीबार केला. आयएनएस कोलकाताने जहाजाची स्टिअरिंग सिस्टीम आणि नेव्हिगेशनल मदतीला ठप्प करत तिची हालचाल बंद पाडली. यानंतर सी-१७ विमानातून मार्कोस कमांडोज खाली उतरले आणि जहाज ताब्यात घेतले.

बंडखोरांचा आणखी एका जहाजावर हल्ला

येमेनच्या हौथी (पान २ वर)

# राजकीय पक्षांना कोट्यवधी देणाऱ्यांमध्ये ३ कंपन्या बीफ एक्सपोर्टर

नवी दिल्ली : देशात सध्या इलेक्टोरल बाँडचा मुद्दा चांगलाच चर्चेत आहे. राजकीय पक्षांना कोट्यवधी रुपयांची देणगी देणा-या कंपन्यांविषयी धक्कादायक माहिती समोर येत आहे. या कंपन्यांनी इलेक्टोरल बाँडच्या माध्यामातून भरभरून देणग्या दिल्या आहेत.

समोर आलेल्या डेटानुसार राजकीय पक्षांना देणगी देणा-या कंपन्यांपैकी तीन कंपन्या या बीफ उद्योगातील आहेत. तसेच यामध्ये सर्वाधिक देणगी फ्यूचर गेमिंग अँड हॉटेल सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीने दिली आहे. ही कंपनी लॉटरी व्यवसायाशी संबंधीत असून याचे मालक सेंटियागो मार्टिन आहेत. सध्या मार्टिन कोट्यधीश आहेत पण एकाकाळी ते म्यानमारमध्ये मजूर म्हणून काम करत होते. सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिल्यानंतर स्टेट बँक ऑफ इंडियाने इलेक्टोरल बाँडसंबंधीचा डेटा निवडणूक आयोगाला सोपवला आहे. त्यानंतर हा डेटा निवडणूक आयोगाने त्यांच्या वेबसाइटवर जाहीर केला आहे. या डेटामधून आता वेगवेगळे खुलासे होते आहेत. त्यानुसार अनेक कंपन्या अशा आहेत ज्यांच्यावर ईडी, सीबीआय आणि आयटी डिपार्टमेंटच्या धाडी पडल्यानंतर त्यांनी कोट्यावधी रुपयांचे इलेक्ट्रोल बाँड खरेदी केली. बीफ एक्सपोर्ट करणारी अल्लान सन्स प्रायव्हेट लिमिटेड, फ्रीगोरीफिको अलाना प्रायव्हेट लिमिटेड आणि फ्यूचर गेमिंग देखील या यादीत आहेत. या कंपन्यांच्या विरोधात छापेमारीची कारवाई झाली

(पान २ वर)

# १००१ महिलांकडून श्री सिद्धेश्वरांना महारुद्राभिषेक

## महिलांच्या विविध स्पर्धाही संपन्न



लातूर/प्रतिनिधी: महाशिवरात्री यात्रा महोत्सवानिमित्त शहरातील १००१ महिलांनी ग्रामदैवत श्री सिद्धेश्वरास रविवारी सकाळी महारुद्राभिषेक केला.यावेळी महिलांसाठी विविध स्पर्धाही संपन्न झाल्या.

शहरातील महिलांकडून दरवर्षी ग्रामदैवत श्री सिद्धेश्वरास महारुद्राभिषेक करण्याची परंपरा आहे.यावर्षीही ही परंपरा जपत १००१ महिलांनी ग्रामदैवताला रुद्राभिषेक केला.सकाळी ९ वाजता या रुद्राभिषेकास प्रारंभ झाला.अभिषेक संपन्न झाल्यानंतर महारुद्र पठणही करण्यात आले.

महिलांसाठी विविध स्पर्धा मंदिरात घेण्यात आल्या.यात रताळ्यापासून गोड पदार्थ बनविणे,कडधान्यापासून तिखट पदार्थ तयार करणे यासह विविध प्रकारांचा समावेश होता.या सर्व स्पर्धातील विजेत्या महिलांना लगेचच पारितोषिकांचे वितरण करण्यात आले.स्पर्धांचे परीक्षक म्हणून नीता अग्रवाल व शीला यादव यांनी काम पाहिले. महारुद्राभिषेक व विविध स्पर्धांमध्ये हजारो महिलांनी सहभाग नोंदवला.महारुद्राभिषेक व विविध स्पर्धांच्या यशस्वीतेसाठी शुभदा रेड्डी, सुखदा मांडे व स्मिता गोजमगुंडे यांच्यासह महिलांनी परिश्रम घेतले. उपस्थित सर्वांनी यावेळी महाप्रसादाचा लाभ घेतला.

### वडापावची गाडी लावू देत नाही म्हणून मंत्रालयात सहाव्या मजल्यावरुन मारली उडी

मुंबई : महापालिकेचा अधिकारी वडापावची गाडी लावू देत नाही, म्हणून एका व्यक्तीने मंत्रालयाच्या इमारतीवरुन खाली उडी मारली. दरम्यान, सुरक्षेच्या कारणास्तव मंत्रालयात जाळी लावण्यात आली आहे. या जाळीवर हा व्यक्ती पडला असून पोलिसांनी त्याला बाहेर काढले. अरविंद बंगेरा असे उडी मारलेल्या नागरिकाचे नाव असून तो बोरीवलीचा रहिवासी आहे. महापालिकेचे अधिकारी त्रास देतात म्हणून हे कृत्य केले असल्याचे बंगेरा यांनी म्हटले आहे. याआधीही मंत्रालयावरुन उडी मारत अनेकांनी जीवन संपवण्याचा प्रयत्न केला होता. शिवाय, आजवर मंत्रालयावरुन उडी मारत अनेकांनी जीवन देखील संपवले आहे. त्यामुळे मंत्रालयात जाळी लावण्यात आली आहे. जेणेकरुन असे प्रकार टाळले जातील. मात्र, जाळी लावल्यानंतरही अनेकजण सरकारचे लक्ष वेधण्यासाठी तशाच पद्धतीने उडी मारत जीवन संपवण्याचा प्रयत्न करतात.

# शिवराज पाटील चाकूरकरांचा कव्हेकरांच्या हस्ते सत्कार

लातूर / प्रतिनिधी- देशाचे माजी गृहमंत्री तथा पंजाबचे माजी राज्यपाल मा.श्री. शिवराजजी पाटील चाकूरकर हे लातूर दौर्यावर आले असता भाजपा नेते तथा किसान मोर्चा गोवा राज्याचे प्रभारी माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर व जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सौ.प्रतिभाताई पाटील कव्हेकर यांनी त्यांच्या औसा रोड भागातील देवघर या निवासस्थानी त्यांची भेट घेऊन व पुष्पगुच्छ देऊन यथोचित सत्कार केला.

यावेळी युवा नेते शैलेश पाटील चाकूरकर, सुभाष देवणीकर, जग्गनाथ पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.



यावेळी माजी केंद्रीय गृहमंत्री तथा पंजाबचे माजी राज्यपाल शिवराज पाटील चाकूरकर साहेबांच्याबरोबर झालेल्या चर्चेमध्ये पारिवारीक तसेच देशपातळीवरील व जागतिक स्थरावरील महान सुधारकांनी, संतांनी मानवाच्या, राष्ट्राच्या कल्याणासाठी चुकीच्या रूढी परंपरेला दूर सारून सत्यावर, सदाचारावर समाज निर्मितीसाठी जो त्याग बलीदान दिले. (पान २ वर)

## मराठी पत्रकार संघ कार्यकारणीच्या सहसचिवपदी असलम खाजासाब शेख यांची निवड

अहमदपूर दि.१८ (कारामुंगीकर) मराठी पत्रकार संघ कार्यकारणीच्या सहसचिवपदी असलम खाजासाब शेख यांची निवड झाली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की,नुकतीच मराठी पत्रकार संघ कार्यकारणीची बैठक संस्थापक अध्यक्ष शेटीबा श्रृंगारे यांच्या अध्यक्षते खाली घेण्यात आली. या बैठकीत संघाचे सदस्य असलम



खाजासाब शेख यांची सहसचिव म्हणून सर्वानुमते निवड करण्यात आली. बैठकीला संस्थापक अध्यक्ष शेटीबा श्रंगारे , उपाध्यक्ष अफजल मोमीन, कोषाध्यक्ष प्रा.बालाजी आचार्य, सदस्य - शाम सावंत दै.गावकरी, रुद्रा मुरकुटे दै. वास्ताव वेद ,दगडू पुरी दै. यशवंत, जगन्नाथ बोळे दै.देशोन्नती, गणेश किनकर दै.लोकमत आदी पत्रकार बांधव उपस्थित होते.

# जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र, लातूर च्या वतीने अहमदपूर येथे दिव्यांग विद्यार्थ्यांची नेत्र तपासणी संपन्न

अहमदपूर दि.१८(कारामुंगीकर) जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र, लातूर च्या वतीने अहमदपूर येथे दिव्यांग विद्यार्थ्यांची नेत्र तप-ासणी संपन्न झाली.

याबाबत अधिक माहिती अशी की, दि. १६/०३/२०२४ रोजी चिंतामण परांजपे दृष्टीदान प्रकल्पांतर्गत विवेकानंद रुग्णालय, समाज कल्याण विभाग, लातूर, जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र लातूर कार्यन्वित अभिकर्ता संवेदना प्रकल्प, हरंगूळ (बु) व ग्रामीण रुग्णालय, अहमदपूर यांच्या संयुक्त विद्यमाने दिव्यांग विद्यार्थ्यांची नेत्र तपासणी शिबिर उपजिल्हा रुग्णालय निलंगा येथे संपन्न झाले.

या शिबिरात २१० दिव्यांग विद्यार्थी , काळजीवाहक



यांची नेत्र व आरोग्य तपासणी करण्यात आली.

यावेळी, ग्रामीण रूग्णालयाचे वैद्यकीय अधी-क्षक डॉ. शिवाजी किशनराव सुरजमल, श्री गणेश सुर्यवंशी, डॉ . अमृत चिंचवडे, श्री निलेश रेड्डी, जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र लातूर चे बहुउद्देशीय पुनर्वसन कार्यकर्ता श्री बस्वर-ाज पैके, मानसोपचार तज्ञ श्री. नवाज शेख, श्री दत्तु बिरादार, श्री इंद्राळे, श्री गुनराज मंडाले, विवेकानंद रुग्णालयाचे श्री. सचिन मानकोसकर, श्रीमती सु-वर्णा शेटे, श्री श्रीकांत तुरटवाड, श्री संतोष खटाळ, श्री प्रशांत भोसले, श्री आत्माराम पळसे, दिव्यांग विद्यार्थी, मुख्याध्यापक, विशेष शिक्षक, काळजी वाहक, पालक व मान्यवर उपस्थित होते. या तपासणी शिबिरामध्ये एकूण शाळेच्या विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात आली.

# भारतीय जनसंसदेच्या जिल्हा अध्यक्ष पदी हनिफ शेख यांची निवड

अहमदपूर दि.१८(कारामुंगीकर) भारतीय जनसंसदेच्या जिल्हा अध्यक्ष पदी हनिफ शेख यांची निवड करण्यात आली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, सामाजिक चळवळीत अग्रेसर असलेल्या भारतीय जनसंसदेच्या ला-तुर जिल्हा अध्यक्षपदी सामाजिक कार्यकर्ते हनिफ शेख यांची निवड जनसंसदेचे राज्य अध्यक्ष अशोक सब्बन यांनी नुकतीच करण्यात आली आहे. या निवडीबद्दल त्यांचा मित्र परिवाराच्या वतिने सन्मान करण्यात आला.

येथील सामाजिक नेते तथा पद्मश्री अण्णा हजारे प्रणीत भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन न्यास चे लातूर माजी जिल्हाध्यक्ष हनिफ शेख यांचे कार्य सर्वपरिचीत असुन ते गेल्या ३५ वर्षापासून सामाजिक कार्यात अग्रेसर असतात त्यांच्या याच



कामाची दखल घेत भारतीय जनसंसदेने घेतली असुन संसदेचे राज्याध्यक्ष आशोक सब्बन यांनी हनिफ यांचे लातूर जिल्हा अध्यक्ष पदी निवड केली असुन त्यांच्यावर लातूर जिल्ह्याची जबाबदारी दिली आहे.भारतीय जनसंसदेच्या माध्यमातून देशभरातील गोरगिरीबांच्या अडचणी सोडविण्याचे काम सर्वोत्तम रित्या केले जाते संसदेणे अनेक प्रश्नांसाठी लढा देऊन सामाजिक प्रश्न सोडवीण्याचे काम केले आहे.

नुतन जिल्हाध्यक्ष हनिफ शेख यांच्या निवडीबद्दल त्यांचा मित्र परिवाच्या वतिने सन्मान करताना जिवनराव बोंडगे, बाबुअप्पा मिटकरी , भाजपाचे अँड.भारत चामे,डॉ. बासिदखान पठाण, काँग्रेसचे प्रकाश ससाणे,चंद्रकान्त आरसुळ, राजु शेख,अलिम शेख, आनंत जाधव, खय्युम शेख, नंदु यादव, विष्णु माने, रहिम शेख, महेश गायकवाड आदींसह अनेकांची उपस्थिती होती.

# विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षदी अक्षय बोडके, सचिवपदी योगेश कांबळे तर उपाध्यक्षपदी अक्षय कांबळे







हडोळती दि.१८(नागसेन गायकवाड) हडोळती येथे सार्वजनिक जयंती निवड समितीची बैठक पार पडली यावेळी विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी अक्षय साहेबराव बोडके यांची , सचिवपदी योगेश विजय कांबळे यांची तर उपाध्यक्षपदी अक्षय कांबळे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

याबाबत अधिक माहिती अशी की, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त नुकतीच गोरोबा शंकर कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली यावेळी जयंती महोत्सव समितीची कार्यकारणी जा-हीर करण्यात आली. त्यात अध्यक्ष-अक्षय साहेबराव बोडके, उपाध्यक्ष-अभय रमेश कांबळे, सचिव-योगेश विजय कांबळे, सहसचिव-भिमराव भगवान मारकोळे, कोषाध्यक्ष-अक्षय निळकंठ कांबळे, सहकोशाध्यक्ष- बालाजी नन्हू कांबळे, संघटक- नरसिंग गंगाधर कांबळे, सल्लागार-वैजनाथ कांबळे, रमेश कांबळे, गोरोबा कांबळे, भीमाशंकर जाभाडे, नरसिंग संपत कांबळे, बबन बोडके, मनोज कांबळे, मनोज काशिनाथ कांबळे आदींची सर्वानुमते निवड करण्यात आली. गावा-तील सर्व बौद्ध उपासकाच्या उपस्थितीमध्ये सहमताने सद-रील जयंती उत्सव समितीच्या पदाधिकारी व सदस्यांची निवड करण्यात आली.

# सामाजिक संस्थेमूळे भागते बस स्थानकात प्रवाशांची तहान

## श्रीराम जानकी भवन व रोकडेश्वर सेवाभावी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने अहमदपूर बस स्थानकात पानपोईची व्यवस्था

अहमदपूर दि.१८(कारामुंगीकर) शहरातील बसस्थानकात स्व श्रीमती जानकबाई श्रीरामजी व्यास यांच्या पुण्यस्मरणार्थ श्रीराम जानकी भवन व रोकडेश्वर सेवाभावी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने अहमदपूर बस स्थानकात गेल्या १७ वर्षापासून प्रवासासाठी पानपोईची व्यवस्था करुन प्रवाशांची तहान भागविली जाते.

याबाबत अधिक माहिती अशी की, जीवन जगत असताना आपण समाजाचं काही देणं लागतो या उद्देशाने तीन रांजण ठेवून सुरू केलेल्या पाणपोईमुळे प्रवाशांना भर उन्हाळ्यात मोठा आधार मिळत असून ये- जा करणाऱ्या प्रवाशांची तहान या पानपोईमुळे भागत आहे. उन्हाळ्याची चाहूल लागताच जनसेवेच्या भावनेतून पाणपोई उभारण्यासाठी सामाजिक संस्था दिवसेंदिवस कमी होऊ ला-गले आहेत. कधीकाळी प्रत्येक चौकात दिसणारी पाणपोई आता शहरातील कोणत्यातरी भागात दिसून येत आहे यापू-र्वी अहमदपूर बस स्थानकात प्रवाशांसाठी थंड पिण्याच्या पाण्याची सोय नव्हती प्रवाशांची होणारी गैरसोय पाहून शहरातील या संस्थेच्या वतीने पाणपोई सुरू करण्यासाठी पुढाकार घेतला.

सामाजिक संस्थेने तीन रांजणाच्या माध्यमातून पाणप-ोई सुरू केली.दररोज स्वच्छ पाण्याने रांजणे भरून ठेवली जातात भर उन्हाळ्यात या पानपोईचा आधार प्रवाशांना मिळत आहे तसेच या संस्थेकडून शहरात सतत धार्मिक सामाजिक उपक्रम राबवले जातात या पाणपोईचे उद्घाटन अहमदपूर नगर परिषदेचे मुख्याधिकारी आयएएस नमन गोयल यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी



आगार प्रमुख पृथ्वीराज कोकाटे साहेब हे होते.

आपल्या उद्घाटनपर भाषणात मुख्याधिकारी नमन गोयल म्हणाले की, नागरिकांनी आठवड्यातून एकदा नळा-ला पाणी येते का? असा प्रश्न विचारले आणि आता मी आलो आहे योग्य उपाययोजना करून दोन दिवस आड शहराला पाणीपुरवठा करण्याची व्यवस्था करेन असे आश्वासन देवून पाणपोई लावलेल्या संस्थेच्या कार्याबद्दल शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी श्रीराम जानकीभवन चे अध्यक्ष राधेश्याम पुरोहित सचिव जुगलकिशोरज शर्मा नितीन धर्माधिकारी, प्रा मारुती बुद्रुक पाटील, दिनकर मदेवाड माहेश्वरी महासभाचे अध्यक्ष- सचिन बजाज, सचिव- आनंद बाहेती युवा माहेश्वरी चे अध्यक्ष- रविराज भुतडा, सचिव- गिरीश बाहेती, गोपाल शर्मा, विनोद भुतडा, महेश पाटील, गणेश शर्मा, श्रीकांत शर्मा, सोमनाथ पुणे, दिनेश सोनी, गणेश शर्मा भागवत सोलीवाल, विन-ोद भुतडा, महेश पाटील, बालू मेनकुदळे, माणिक गुळवे सचिन बजाज आदींची उपस्थिती होती.

---

पान १ वरून

### ६ काँग्रेस...

सुधीर शर्मा, रवी ठाकूर, राजिंदर राणा, इंदर दत्त लखनपाल, चेतन्या शर्मा आणि देविंदर कुमार भुट्टो या सहा बंडखोर आमदारांना २९ फेब्रुवारी रोजी सभागृहात निलंबित करण्यात आले होते. या बंडखोर आमदारांनी कट मोशन आणि बजेट दरम्यान हिमाचल सरकारच्या बाजूने मतदान करण्याच्या काँग्रेसच्या व्हिपला झुगारले होते. बंडखोर आमदारांच्या अपात्रतेनंतर सभागृहाचे प्रभावी संख्याबळ ६८ वरून ६२ वर आले आहे, तर काँग्रेसच्या आमदारांची संख्या ४० वरून ३४ वर घसरली आहे.

### विकसित...

लागले आहेत. इंडिया आघाडीच्या मुंबईच्या सभेनंतर पंतप्रधान मोदी १२० तास दक्षिण विजय अभियानावर आहेत. भाजपाने ४०० पार लक्ष्य पूर्ण करण्यासाठी प्रत्येक प्रयत्न सुरू केलेत. ४०० पार हा नारा तेव्हाच पूर्ण होऊ शकतो जेव्हा भाजपा दक्षिणेकडील राज्यात विजय मिळवू शकेल. विशेषत: तामिळनाडू, केरळ आणि आंध्र प्रदेशात भाजपा बहुतांश जागा जिंकण्याचा प्रयत्न करत आहे.

### उबाठा च्या...

देशातील ८० कोटी लोकांना मोफत धान्य दिलं जात आहे.

लोकांनी जागा दाखवून दिली मोदीजी एका उंचीवर घेऊन गेले आहेत. चौकीदार चोर आहेत म्हणाले, पण लोकांनी त्यांना जागा दाखवून दिली. यांच्याकडे पंतप्रधान पण चेहरा नसल्याने सातत्याने एकमेकांना पाहत असतात अशी टीका त्यांनी केली. शिंदे यांनी राहुल गांधी यांच्या ठाण्यामधील रोडशोवरून खोचक टोमणा मारला. उद्धव ठाकरे यांना देण्यात आलेल्या सभेतील भाषणाच्या कालावधीवरही शिंदे यांनी टीका केली. पाच मिनिटे भाषणासाठी देण्यात आली यावरून त्यांची पत दिसून आली, असा टोला शिंदे यांनी लगावला.

हिंदू बंधू भगिनींनो म्हणायला जीभ कचरली का?

माझ्या तमाम हिंदू बांधवांनो हा शब्द कालपासून बंद झाला. काल त्यांनी हिंदू बंधू भगिनींनो म्हणणं टाळलं. हिंदू बंधू भगिनींनो म्हणायला जीभ कचरली का, असं म्हणत मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी उद्धव ठाकरेंवर जोरदार निशाणा साधला आहे.

### आम्हाला...

सुप्रीम कोर्टाने १५ फेब्रुवारीला ऐतिहासिक निर्णय दिला होता. यात २०१८ मध्ये मोदी सरकारने आणलेल्या निवडणूक रोख्यांना सुप्रीम कोर्टाने असंविधानिक ठरवले होते. शिवाय, निवडणूक आयोगाला निवडणूक रोख्यांसंदर्भातील सर्व माहिती सार्वजनिक करण्याचे आदेश दिले होते. सुप्रीम कोर्टाच्या निर्देशानुसार निवडणूक आयोगाने रोख्यांसंदर्भातील माहिती आपल्या वेबसाईटवर अपलोड केली आहे.

### वंचितच्या...

दरम्यान, वंचित बहुजन आघाडीने निर्णय घेऊन आम्हाला कळवावे, त्यानंतरच आम्ही सकारात्मक चर्चा करू, अशी भूमिका राष्ट्रवादी शरद पवार गटाने घेतली आहे. त्यामुळे आता वंचित काय निर्णय घेणार यावर महाविकास आघाडीचे जागावाटप अवलंबून असेल.

### अपहरण...

बंडखोरांनी रविवारी पहाटे एडनच्या आखातात आणखी एका जहाजाला लक्ष्य केले. लाल समुद्राकडे जाणा-या महत्त्वाच्या जलमार्गावरील जहाजांना हौथी बंडखोर टार्गेट करत असून यामुळे जगभरातील व्यापारावर मोठा परिणाम झाला आहे. एडन हे दक्षिण येमेनमधील एक शहर असून येथे देशातील निर्वासितांचे सरकार आहे. हौथी बंडखोरांनी या भागात वारंवार ड्रोन आणि क्षेपणास्त्र हल्ले केले आहेत. यामुळे एडनच्या आखातातून इंधन आणि इतर मालवाहू जहाजांची वाहतूक विस्कळीत झाली आहे.

### राजकीय...

त्यानंतरच या कंपन्यांनी मोठ्या प्रमाणात इलेक्टोरल बाँड खरेदी करून राजकीय पक्षांना देणग्या दिल्या.

९ जुलै २०१९ रोजी अल्लाना सन्सने इलेक्टोरल बाँडच्या स्वरुपात दोन कोटी रुपये दान केले होते. यानंतर ९ ऑक्टोबर रोजी एक कोटी आणखी देणगी देण्यात आले. फ्रीगोरीफिको अल्लाना कंपनीने देखील २०१९ मध्ये ९ जुलै रोजी दोन कोटी आणि २२ जानेवारी २०20 रोजी दोन कोटींचे इलेक्टोरल बाँड खरेदी केले. अल्लानाा ग्रुपशी संबधीत अल्लाना कोल्ड स्टोरेजने ९ जुलै २०१९ मध्ये एक कोटींचे इलेक्टोरल बाँड खरेदी केले. या तिन्ही कंपन्या अल्लाना ग्रुपशी सलग्न आहेत मात्र यांचे डायरेक्टर हेड वेगवेगळे आहेत. अल्लाना कंपनी १८६५ साली स्थापन झाली आणि ही प्रोसेस्ड फूड एक्सपोर्ट करते.

२ हजार कोटींचा कर बुडविला

अल्लाना ग्रुपच्या चीन कंपन्यांनी एकूण सात कोटी देणगी दिली आहे. एप्रिल २०१९ मध्ये कंपनीवर इन्कम टॅक्स विभागाची धाड पडली होती. यानंतर ९ महिन्यात अल्लाना ग्रुपने सात कोटींचे इलेक्टोरल बाँड खरेदी केले. इन्कम टॅक्स अधिका-यांनी दिलेल्या माहितीनुसार अल्लाना कंपनी बीफ एक्सपोर्ट करणारी देशातील सर्वात मोठी कंपनी मानली जाते. अल्लान ग्रुपवर दोन हजार कोटींचा टॅक्स बुडवल्याचा आरोप आहे.

### शिवराज...

याबरोबरच कृत्रिम बुध्दिमत्तेवर चर्चा केली. कृत्रिम वस्तूने दर्शविलेल्या बुध्दिमान वर्तमानास कृत्रिम बुध्दिमत्ता असे आपण म्हणतो. भारतात. कृत्रिम बुध्दिमत्ता नियमन हे भगवतगितेतील श्लोकाचा आधार घेऊन केलेले आहे. त्यामुळे ते कार्य गैरसंवैधानिक आहे. भगवान श्रीकृष्णाच्या कुळात जन्म घेतलेल्या राजाला कृत्रिम बुद्धिमत्ता नियमनाचा अधिकार आहे आणि या कृत्रिम बुध्दिमत्तेवरच देशाची जागतिक वाटचाल सुरू असल्याची माहितीही त्यांनी यावेळी बोलताना दिली.

याबरोबरच राजनीतीमधील सर्वच पक्षातील घसरत चाललेले स्वतःचे चारित्र्य, सामाजिक जाणिव, विकासात्मक दृष्टीकोन सेवाभाव व व्हिजन यामध्ये सकारात्मक बदल करण्यासाठी भारतीय मूल्य, अध्यात्म व थोर नेत्यांचे विचार स्मरणात ठेवण्याची नितांत गरज आहे, हे विचार तरूणांना प्राथमिक शिक्षणापासून देण्याची गरज आहे. अशी माहितीही चाकूरकर साहेबांनी दिली असल्याचे माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी यावेळी बोलताना सांगितले.

## निवडणूकीत नमुना मतपत्रिका छपाईस निर्बंध

धाराशिव दि.१८ (प्रतिनिधी) - भारत निवडणूक आयोगाने १६ मार्च रोजी सार्वत्रिक लोकसभा निवडणूकीचा कार्यक्रम घोषित केला आहे. त्याचदिवसापासून आदर्श आचारसंहिता अंमलात आल्याने जिल्ह्यातील लोकसभा सार्वत्रिक निवडणूकीची संपूर्ण पक्रिया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टिकोनातून राजकीय पक्षांनी, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी किंवा त्यांच्या प्रतिनिधीने किंवा त्यांच्या हितचिंतकाने मुद्रणालयाच्या मालकाने व इतर सर्व माध्यमांद्वारे छपाई करणाऱ्या मालकाने तसेच प्रकाशकाने नमुना मतपत्रिका छापताना इतर उमेदवाराचे नाव व त्यांना नेमून देण्यात आलेले चिन्ह वापरणे, नमुना मत पत्रिकेसाठी आयोगाने निश्रि्चत केल्याप्रमाणे कागद वापरणे, आयोगाने निश्रि्चत केलेल्या कागदाच्या आकारामध्ये नमुना मत पत्रिका छापणे आदी बाबींवर निर्बंध घालण्यात येत आहेत. नमुना पत्रिका छपाईस निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत म्हणजेच ६ जूनपर्यंत संपूर्ण जिल्ह्यात निर्बंध घालण्यात येत असल्याचे आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ.सचिन ओंबासे यांनी दिले आहेत.

## जाहीर प्रगटण

तमाम नागरीकांना या जाहीर प्रगटणाव्दारे सुचित करण्यात येते की माझे पक्षकार नामे. अर्जुन माधव कांबळे रा. मन्ना उमरगा ता. उदगीर येथील रहीवाशी असून यांच्या व इतर त्यांच्या भाऊबंधानच्या हक्काची मौजे होनाळी ता. देवणी सर्वे नं. ३८ (ब) / गट नं. ३८/३ क्षेत्र ३ हेक्टर ७० गुंठे, जमीन गट नं. ३८/४ क्षेत्र ३ हे. ७१ गुंठे.

सदर शेतजमीनी बाबत देवणी येथील दिवाणी न्यायालय क. स्तर येथे दि.दा. क्र. ५३/२०१४ विष्णु वि. केराबाई व इतर हा वाटणी बाबत न्यायप्रविष्ठ आहे. सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ असतांना होनाळी येथील उत्तमराव रामराव बेळकोने हे त्यांच्या मुलाच्या नामे श्रेयश उत्तमराव बेळकोने हे त्यांचे नावावरील जमीन गट नं. ३८/३ क्षेत्र ० हे. ८५ गुंठे ही जमीन बेकायदेशीररित्या विक्री करण्याच्या प्रयत्नात आहेत असे आमचे अशीलाला समजले आहे.

तसेच वरील दावा मिळकतीपैकी इतर जमीन सुद्धा न्यायालयात प्रलंबीत खटल्याचा भाग आहे. मी वरील पक्षकाराचा वकील या नात्याने असे सुचीत करतो की, सदर मिळकतीबाबत आमचे पक्षकाराचे हितसंबंध गुंतलेले आहेत. सबब हितसंबंधाचा निपटारा होईपर्यंत कोणीही या जमीन जायदादीचा खरेदी विक्रीबाबतचा व्यवहार करू नये किंवा कुठल्याही बँकेने फक्त सात बारा पाहून कुठलाही कर्ज देवू नये तसे केल्यास संबंधीता विरूध्द कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल म्हणून सबब या जाहीर प्रगटनाची सर्व संबंधीतानी गंभीर नोंद घ्यावी म्हणून मी आज रोजी हे जाहीर प्रगटन प्रसिध्दीस देत आहे.

दि.१८/०३/२०२४
ठिकाण :- उदगीर

**जाहीर प्रगटण देणार**
अॅड. बाळासाहेब प. नवटक्के
उदगीर ता. उदगीर

यशवंत
धाराशिव
जिल्हा
मंगळवार दि. १९ मार्च २०२४
कार्यालय/फॅक्स : ०२४७२-२२८९१२, E-mail malikarjun.sonawane @gmail.com



## मंत्री प्रा. डॉ. सावंत यांच्या वाढदिवसानिमित्त रुग्णांना फळांचे वाटप

वाशी दि.१८ (प्रतिनिधी) – महाराष्ट्र राज्याचे सार्वजनिक आरोग्य मंत्री तथा पालकमंत्री प्रा डॉ तानाजीराव सावंत यांच्या वाढदिवसानिमित्त वाशी तालुक्यातील पारा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील रुग्णांना फळांचे वाटप करण्यात आले.
रुग्णांना फळे वाटप करताना पाराचे सरपंच माजी राजेंद्र काशीद, पंस सदस्य विष्णुपंत मुरकुटे, डोंगरीचे सरपंच अशोक भराटे, पिंपळवाडीचे सरपंच सुनील उंदरे, उपसरपंच अतुल चौधरी, मदन मुरकुटे, फक्राबादचे माजी सरपंच विश्वबर भराटे, सोसायटी चेअरमन महेंद्र मुरकुटे, व्हा. चेअरमन विकास पानसे, सुर्यकांत पांचाळ, दत्तू शिनगारे, अंकुश फुरडे आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.



# लोकसभेसाठी २१३९ मतदान केंद्रावर २० लाख ४ हजार मतदार करणार मतदान – ओंबासे

धाराशिव दि.१७ (प्रतिनिधी) – ४० – उस्मानाबाद लोकसभा मतदारसंघासाठी निवडणुकीची प्रक्रिया सुरू झाली असून आचार संहिता लागू झाली आहे. या लोकसभेसाठी २ हजार १३९ मतदान केंद्राद्वारे धाराशिव जिल्ह्यासह औसा व बार्शी तालुक्यातील २० लाख ४२ हजार २८८ मतदार करणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ सचिन ओंबासे यांनी दि.१६ मार्च रोजी दिली. दरम्यान, या मतदारसंघात अनुचित प्रकार रोखण्यासाठी ४० बैठे पथके तैनात करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.
जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात लोकसभा निवडणुकी संदर्भात आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ मैनक घोष, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, उपजिल्हाधिकारी शिवाजी शिंदे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी शिरीष यादव आदी उपस्थित होते. पुढे बोलताना डॉ ओंबासे




म्हणाले की, उस्मानाबाद लोकसभा मतदार संघामध्ये औसा, उमरगा, तुळजापूर, उस्मानाबाद, परंडा व बार्शी या ६ विधानसभा मतदारसंघाचा समावेश करण्यात आलेला आहे. यासाठी औसा मतदार संघासाठी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. यांचे नाव, कार्यालयीन दूरध्वनी, मोबाईल क्रमांक पुढीलप्रमाणे – औसा– अविनाश कोरडे, उपविभागीय अधिकारी (०२३८२–२५१३१७, ७३८७०६०४६३), उमरगा – गणेश पवार, उमरगा उपविभागीय अधिकारी (०२४७५–२५१२५१, ९६६५६०८०३३), तुळजापूर – संजयकुमार ढवळे, उपविभागीय अधिकारी, धाराशिव (०२४७१–२४२०२७, ९७६६०४५११५), उस्मानाबाद – संजय पाटील, उपविभागीय अधिकारी, कळंब (०२४७२–२२४५४६, ९६२३३२३७३२), परंडा – वैशाली पाटील उपविभागीय अधिकारी, भूम (०२४७८–२७२००६) व बार्शी – प्रमोद गायकवाड विशेष भूसंपादन अधिकारी, सोलापूर (९८६०२५८९३२) यांचा समावेश करण्यात आला आहे. तर दि. १२ ते १९ एप्रिलपर्यंत उमेदवारांना आपले उमेदवारी अर्ज दाखल करता येणार आहेत. तर दि.२० एप्रिल रोजी अर्जांची छाननी करण्यात येणार असून २२ एप्रिल रोजी अर्ज मागे घेता येणार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच २५८ झोनल बीएलओंची नियुक्ती केली असून १० हजार २६६ मनुष्यबळांची आवश्यकता लागणार असल्याचे त्यांनी नमूद केले. तर मतदानासाठी बीयु– २३५४, सीयु– २३५४ व व्हीव्हीपॅट २४५४ ईव्हीएम–व्हीव्हीपॅट राखीवसह उपलब्ध करण्यात येणार आहेत. तसेच २४६ झोनसाठी २२९ बसेस व ३१२ जीप आधी वाहनांची व्यवस्था करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. दि.२३ जानेवारी २०२४ नुसार १० लाख ५८ हजार १५४ पुरुष तर ९ लाख ४६ हजार ५४ महिला व इतर ७८ मतदान यासाठी पात्र असून आणखी नवीन नोंदणी करणाऱ्या मतदारांची संख्या वाढू शकते असे त्यांनी सांगितले. दिव्यांगासाठी विशेष मतदान केंद्राची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. यामध्ये सखी – ६, दिव्या – ६, पडदानशीन – २०१, क्रिटिकल – ८, युवा– १० व मॉडेल मतदान केंद्र ५४ आहेत.

सर्विस मतदार संख्या ३८०४ असून यामध्ये ८६ महिला तर ३७१८ पुरुषांचा समावेश आहे. तर ग्रामीण भागात १७७४ तर शहरी भागात ३६५ मतदान केंद्रांचा समावेश आहे. तसेच ८५ वर्षापेक्षा जास्त वय असलेले मतदार ३५ हजार ७५४ मतदार आहेत. यामध्ये १५ हजार ८४३ पुरुष व १९९११ महिला मतदारांचा समावेश आहे. तर १९८०३ पीडब्ल्यूडी इलेक्ट्रोल मतदार असून १२८७४ पुरुष व ६९२८ महिला मतदारांचा समावेश आहे.

निवडणुकीच्या काळामध्ये अवैध रक्कम, दारू व मादक पदार्थांच्या वाहतुकी संदर्भात होणाऱ्या जप्तीबाबत Election Seisure Management System (ESMS) प्रणाली कार्यान्वित करण्यात आली आहे. पोस्टल बॅलेट मतदान सुविधेसाठी ८५ वर्षाच्यावरील नागरिक व दिव्यांगांकडून फॉर्म नं. – २२ डी नमुना बीएलओंच्या माध्यमातून त्यांच्या घरी जाऊन भरून घेण्यात येणार आहे. विशेष म्हणजे वृत्तपत्रे, इलेक्ट्रॉनिक व सोशल मीडिया या माध्यमांनी निवडणुकीच्या काळामध्ये फेक न्यूज व अफवा पसरवू नयेत असे आवाहन डॉ ओंबासे यांनी केले.

# ५० कोटी शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा होणार – आ. पाटील

धाराशिव दि.१७ (प्रतिनिधी) – खरीप २०२२ मधील नुकसानीपोटी अनुज्ञेय भरपाईपासून वंचित राहिलेल्या जिल्ह्यातील उर्वरित ६ महसूल मंडळातील शेतकऱ्यांना पुढील आठवड्यात पीक विमा मिळणे अपेक्षित आहे. त्यामुळे कृषि आयुक्त कार्यालयाकडे जमा रक्कम विमा कंपनीच्या खात्यावर वर्ग होणे अभिप्रेत असल्याची माहिती आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.
शासन मार्गदर्शक सूचनांचा चुकीचा संदर्भ देत भारतीय कृषी विमा कंपनीने खरीप २०२२ मधील नुकसानी पोटी चुकीच्या पद्धतीने ५० टक्के भारांकन लावून नुकसान भरपाई वितरित केली होती. मात्र शासन व प्रशासनाच्या कठोर भूमिकेनंतर उर्वरित ५० टक्के रक्कम वितरित करण्यास विमा कंपनीने सहमती दर्शविली. एकूण अनुज्ञेय २८२ कोटी रुपयांमधील जवळपास २३० कोटी रुपये वितरितही केले आहेत. शासनासोबत झालेल्या कराराप्रमाणे जमा विमा हप्त्याच्या रकमेपेक्षा भरपाईची रक्कम ११० टक्याहून अधिकची असल्यामुळे विमा कंपनीला काही रक्कम शासनाकडून येणे बाकी होती. ती रक्कम प्राप्त होताच उर्वरित ५० कोटी रुपये वितरण करण्याचे विमा कंपनीने मान्य केले आहे. या रकमेचा शासन निर्णय निर्गमित होवून रक्कम कृषी आयुक्तांकडे जमा झाली आहे. ती रक्कम विमा कंपनीच्या खात्यात वर्ग होणे अपेक्षित असून पुढील एक ते दोन दिवसांत ही रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा व्हावी, यासाठी प्रयत्न राहणार असल्याचे त्यांनी सांगितले आहे. यामध्ये कळंब तालुक्यातील मोहा, धाराशिव



तालुक्यातील पाडोळी (आ) व तुळजापूर तालुक्यातील सलगरा (दि.) व सावरगाव तसेच परंडा तालुक्यातील अनाळा व सोनारी महसूल मंडळांचा समावेश आहे. तसेच सन २०२० व २०२१ मधील उर्वरित पीक विम्यासाठी न्यायालयीन लढा सुरू असून मार्च २० व २१ मार्च रोजी उच्च न्यायालयात पुढील सुनावणी आहे. दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी व विषयामध्ये नियोजनबद्ध पाठपुरावा चालू असल्याचे आ पाटील यांनी सांगितले आहे.

## तुळजापूर येथे मे मध्ये बौद्ध धम्म परिषदेचे आयोजन

नळदुर्ग दि.१८ (प्रतिनिधी) – भारतीय बौद्ध महासभेच्यावतीने बौद्ध संस्कारांचे जतन आणि पठण व्हावे, बौद्ध संस्कार प्रत्येक घराघरांमध्ये रुजावे, बौद्ध संस्कारांची एक नाळ तुळजापूर शहर व परिसरात निर्माण व्हावी जिल्ह्यामध्ये समता स्वतंत्र्य आणि बंधुता समानता आणि अखंडता निर्माण व्हावी. तसेच बौध्दांचे संस्कार प्रत्येक गावात व प्रत्येक घरात पोहोचवण्यासाठी तुळजापूर येथे मे महिन्यात बौद्ध पौर्णिमेचे औचित्य साधून बौद्ध धम्म परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.
तुळजापूर येथे धम्म परिषद घेण्यात यावी यासाठी भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष डॉ भीमराव यशवंतराव आंबेडकर यांची धाराशिव जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांच्या शिष्टमंडळाने भेट घेऊन निमंत्रण दिले. यामध्ये दक्षिण पदाधिकारी जिल्हाध्यक्षा विजयमाला धावारे, जिल्हा सरचिटणीस विद्यानंद वाघमारे, जिल्हा कोषाध्यक्ष राजश्रीताई कदम,



जिल्हा संस्कार विभागाचे उपाध्यक्ष बाळासाहेब बागडे, जिल्हा पर्यटन विभागाचे उपाध्यक्ष विश्वास पांडागळे, जिल्हा संघटक विजय बनसोडे व जिल्हा कार्यालयीन सचिव दादासाहेब बनसोडे यांचा समावेश आहे. बौद्ध संस्कार क्षम पिढी निर्माण व्हावी. बौद्ध धम्म परिषदेसाठी बौद्ध व आंबेडकर प्रेमी जनता, बौद्धाचार्य, केंद्रीय शिक्षक, माजी श्रामनेर, शिक्षक, शासकीय, निम शासकीय कर्मचारी यांनी डॉ भीमराव आंबेडकर यांना ऐकण्यासाठी उपस्थित रहावे असे आवाहन पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

## आचार संहितेचा भंग होणार नाही याची राजकीय पक्षांनी दक्षता घ्यावी – डॉ. ओंबासे



धाराशिव दि.१८ (प्रतिनिधी) लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ चा निवडणूक कार्यक्रम भारत निवडणूक आयोगाने जाहीर केला आहे. त्यामुळे निवडणुकीची आचारसंहिता लागू झाली आहे. निवडणूक आयोगाच्या नियमानुसार निवडणुकीची कामे पारदर्शक पद्धतीने करण्यात येणार आहे. विविध राजकीय पक्षांनी निवडणुकीच्या काळात आचार संहितेचा भंग होणार नाही याची दक्षता घ्यावी.असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओंबासे यांनी दि.१६ मार्च रोजी केले.
जिल्हाधिकाऱ्यांच्या कक्षात लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीची आचार संहिता लागू झाल्यानंतर विविध राजकीय पक्षांच्या पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत ते बोलत होते. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनक घोष व उपजिल्हा निवडणूक अधिकारी शिरीष यादव यांच्यासह राजकीय पक्षांचे बाळासाहेब सुर्यवंशी, सुनील साळुंखे, जगदीश पाटील, संजय वाघमारे, कलिम पठाण, इंद्रजीत देवकते, प्रतीक माने राजाभाऊ शेरखाने व भारत इंगळे आदी पदाधिकारी उपस्थित होते. पुढे डॉ.ओंबासे म्हणाले की, निवडणुकीच्या काळात कुठे आचार संहितेचा भंग होत असेल तर त्याची तक्रार सी–व्हिजिल ऍपवर नोंदविता येते. तर अडतदारला २ लक्ष रुपये, रिटेलरला १ लक्ष रुपये आणि सामान्य नागरिकाला २० हजार रुपये रोख रक्कम सोबत घेऊन जाता येत असल्याचे त्यांनी सांगितले. मात्र या रक्कमेची कागदपत्रे सोबत बाळगणे आवश्यक आहे. यावेळी भरारी पथकांची संख्या वाढविण्यात आली आहे. ईव्हीएम मशीनवर जास्तीत जास्त ३८४ उमेदवारांना मतदान करण्याची क्षमता आहे. त्यापेक्षा जास्त उमेदवार असल्यास मतदान पत्रिकेवर मतदान घ्यावे लागते, असे सांगून डॉ.ओंबासे यांनी एक खिडकी योजना व सुविधा पोर्टल याबाबतची माहिती देऊन त्याचा लाभ घ्यावा असे आवाहन त्यांनी केले. यावेळी उपस्थित विविध राजकीय पक्षांच्या पदाधिकाऱ्यांनी निवडणुकीच्या अनुषंगाने त्यांच्याशी विविध विषयांवर चर्चा करून त्यांच्या प्रश्नांचे समाधान केले.

## एनव्हीपी शुगर कारखान्याच्या चाचणी गळीत हंगामाची सांगता



धाराशिव दि.१८ (प्रतिनिधी) – तालुक्यातील जागजी येथील एनव्हीपी शुगर प्रा.लि.जागजी कारखान्याचा चाचणी गळीत हंगामाची सांगता कारखान्याचे मार्गदर्शक आप्पासाहेब पाटील, चेअरमन बालाजी उर्फ नानासाहेब पाटील, सर्व खातेप्रमुख, तोडणी–वाहतूक ठेकेदारव कर्मचारी यांच्या हस्ते गव्हाण पूजन करून करण्यात आला.
धाराशिव तालुक्यातील जागजी येथील एनव्हीपी शुगर कारखान्यास ऊस उत्पादक शेतकरी, वाहन मालक, तोडणी ठेकेदार, चालक, ऊस उत्पादक शेतकरी, खाते प्रमुख व कर्मचारी यांच्या सहकार्यामुळे कमी कालावधीत १ लाख १२ हजार मे.टन उच्चांकी यशस्वी गाळप करू शकलोत. शेतकऱ्यांना गाळप सुरु झाल्यापासून ऊस दिल्यानंतर १५ दिवसांत संबंधित शेतकर्यांच्या खात्यात ऊस बील जमा करून शेतकऱ्यांचा विश्वास संपादन केला आहे. तर ऊस वाहतूकीमध्ये प्रथम क्रमांक बालाजी छत्रभुज बुकन, (२७८६ मे टन), दुतीय क्रमांक भजनदास लाला जमाले, (२४०६ मे टन), तृतीय क्रमांक गोरोबा मधुकर रोटे (२११२ मे टन) व डबल मिनीमध्ये प्रथम क्रमांक श्रीकृष्ण मोकिंदा गडदे (२२३४ मे टन), दुतीय क्रमांक पिंटू बन्सी काळे (१८६३ मे टन) व तृतीय क्रमांक एकनाथ लिंबाजी गडदे (१७९७ मे टन), हार्वे स्टिंग मालक शिवानंद दळवी, बलभीम बुकन, दस्तगीर सय्यद या सर्व वाहतूक ठेकेदारांचा बक्षिस देऊन यथोचित सन्मान करण्यात आला. तसेच १ ते १५ मार्च या कालावधीतील गाळपास आलेल्या उसाचे २८०० रुपयांप्रमाणे बील दि.१६ मार्च रोजी बँक खात्यात वर्ग करण्यात येणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी पवनराजे लोकसमृद्धी मल्टिस्टेट को–ऑप क्रेडिट सोसायटी लि.धाराशिव बँकेत जाऊन आपले बील घ्यावे, असे आवाहन चेअरमन पाटील यांनी केले आहे.

## धाराशिव जिल्ह्यातून मराठा समाजाचे एक हजाराहून अधिक अर्ज दाखल करणार

धाराशिव दि.१८ (प्रतिनिधी) –मराठा समाजाला कायमस्वरुपी टिकणारे आरक्षण ओबीसीमधून मिळावे, त्याचबरोबर सगेसोयर्यांच्या आरक्षणाची अंमलबजावणी व्हावी याकरिता संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्त्वाखाली लोकशाही मार्गाने लढा सुरु असताना सरकारने याकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे सरकारच्या विरोधातील उद्रेक आता लोकसभा निवडणुकीत दाखवून देणार आहोत. म्हणून धाराशिव लोकसभा मतदारसंघात मराठा समाजाचे एक हजाराहून अधिक उमेदवारी अर्ज दाखल करणार असल्याची माहिती सकल मराठा समाजाच्यावतीने दि.१७ मार्च रोजी पत्रकार परिषदेत देण्यात आली.
मराठा आरक्षणासंदर्भात सरकारने घेतलेल्या भूमिकेच्या निषेधार्थ सकल मराठा समाजाच्यावतीने घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत आगामी लोकसभा निवडणुकीबाबत भूमिका स्पष्ट करण्यात आली. यावेळी लोकसभेचे उमेदवार बलराज रणदिवे, अक्षय नाईकवाडी, निखील जगताप, अभिजित सुर्यवंशी, अमोल जाधव, संकेत सुर्यवंशी, रणधीर सुर्यवंशी, प्रतिक बारकुल, सुधीर पवार आदी उपस्थित होते.
आरक्षणाच्या मागणीसाठी मराठा समाजाचे लोकशाही मार्गाने शांततेत आंदोलन सुरु असताना सरकारकडून दडपशाहीचे धोरण अवलंबले जात आहे. विद्यमान सरकारने १० टक्के आरक्षण जाहीर



केले असले तरी ते कायद्याच्या कक्षेत टिकणार नाही. त्यामुळे कायमस्वरुपी टिकणारे आरक्षण ओबीसीमधूनच मिळावे अशी आमची मागणी आहे. परंतू आचार संहिता लागू झाली तरी आंदोलकांना नोटिसा बजावून गुन्हे दाखल करुन समाजात दहशत माजविण्याचे काम सरकार करत असल्याचा आरोप त्यांनी केला. त्यामुळे समाजात असंतोषाची लाट उसळली आहे. सरकारला आता धडा शिकवण्यासाठी लोकसभा मतदारसंघात प्रत्येक गावातून २ ते ५ उमेदवार उभे करण्यात येणार आहेत. समाजाची ताकद आता सरकारला दाखवून देण्यासाठी सकल मराठा समाजाने ही भूमिका घेतली असून धाराशिव जिल्ह्यातून १ हजारांपेक्षा जास्त उमेदवारी अर्ज लोकसभा निवडणुकीत दाखल करण्यात येणार असल्याचे सांगितले. त्या उमेदवारांची अनामत रक्कम गावागावांतील मराठा समाजाकडून लोक वर्गणी जमा करुन भरणार असल्याचेही सांगण्यात आले.

# निवडणूक काळात नोडल अधिकाऱ्यांनी आपल्या जबाबदाऱ्या दक्षतेने पार पाडाव्यात – डॉ. ओंबासे

धाराशिव दि.१८ (प्रतिनिधी) – लोकसभा सार्वत्रिक निवडणूक –२०२४ चा कार्यक्रम भारत निवडणूक आयोगाने १६ मार्च रोजी घोषित केल्याने ४० – उस्मानाबाद लोकसभा क्षेत्रात आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. विविध विभागाच्या विभाग प्रमुखांची निवडणूक विषयक कामे पार पाडण्यासाठी नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे.नोडल अधिकाऱ्यांवर निवडणुकीची सोपविलेली जबाबदारी त्यांनी अत्यंत दक्षतेने व चोखपणे पार पाडावी, असे निर्देश जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ.सचिन ओंबासे यांनी दिले.
लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीची आदर्श आचार संहिता लागू झाल्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात आयोजित निवडणूक नोडल अधिकाऱ्यांच्या बैठकीत ते बोलत होते. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनक घोष, अपर जिल्हाधिकारी शिवाजी शिंदे, निवासी उपजिल्हाधिकारी शोभादेवी जाधव व उपजिल्हा निवडणूक अधिकारी शिरीष यादव आदी उपस्थित होते.
डॉ.ओंबासे म्हणाले की, लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीची आदर्श आचार संहिता लागू झाल्याने तहसिलदार, गट विकास अधिकारी व मुख्याधिकारी यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील विविध ठिकाणी लावलेली राजकीय पक्षांचे झेंडे, जाहिरातीचे फ्लेक्स व बॅनर तात्काळ काढून घ्यावे. यासाठी भरारी पतके गठीत करून या कामाला प्राधान्य द्यावे.केलेल्या कामाचा अहवाल तात्काळ सादर करावा. उद्घाटन व भूमिपूजनाच्या कोनशीला झाकून घ्याव्यात. विविध विभागांच्या संकेतस्थळावर कोणतेही राजकीय नेत्यांचे फोटो नसावे. रुग्ण वाहिकांवर असलेली नावे झाकून टाकावीत. घरांवर झेंडे व जाहिराती लावण्यात आल्या असतील तर त्या काढून घ्याव्यात. वीज वितरण कंपनीच्या खांबावर लावलेले राजकीय जाहिरातींचे फलक काढून टाकावेत. ज्या कामांचे कार्यादेश दिले असतील ती कामे सुरू ठेवावीत. पाणी टंचाई निवारणाची कामे सुरू राहतील असे डॉ.ओंबासे यांनी सांगितले. निवडणुकीच्या काळात भ्रमणध्वनीवर येणाऱ्या अनोळखी क्रमांकाला नोडल अधिकारी व निवडणुकीशी संबंधित अधिकाऱ्यांनी तात्काळ प्रतिसाद दयावा असे सांगून डॉ. ओंबासे म्हणाले, प्रतिसाद न देणाऱ्या प्रकरणी गंभीर दखल घेण्यात येईल. भ्रमणध्वनीवर येणारा कोणताही कॉल टाळू नये. ७६ एफएसटी पथके निवडणूक काळात कार्यान्वित राहतील.राजकीय पक्षांना विविध कामांचे साहित्य,वस्तू व खाद्यपदार्थ खरेदीचे दरपत्रके उपलब्ध करून द्यावी.राजकीय पक्षांच्या सुविधेसाठी त्यांचे प्रशिक्षण घेण्यात यावे. निवडणूक आयोगाच्या नियमानुसार व पारदर्शकपणे निवडणूक पार पाडण्याच्या दृष्टीने नोडल अधिकारी व निवडणुकीशी संबंधित अधिकाऱ्यांनी आपली कर्तव्ये व जबाबदाऱ्या चोखपणे पार पाडाव्यात.असे डॉ. ओंबासे यांनी सांगितले. तर मतदान जागृती व्यापक प्रमाणात करण्यासाठी तसेच मोठ्या संख्येने मतदारांनी विशेषता महिला मतदारांनी मतदान करावे,यासाठी स्वीप कार्यक्रमाच्या माध्यमातून व्यापक प्रमाणात जनजागृती करावी. निवडणूक काळात कोणत्याही अधिकाऱ्याने विनापरवानगी मुख्यालय सोडू नये. अन्यथा संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल. निवडणूक आयोगाच्या नियमानुसार नागरिकांनी निवडणूक काळात रोकड जवळ बाळगावी, असेही डॉ. ओंबासे यांनी सांगितले.
या बैठकीला आचारसंहिता कक्षाचे नोडल अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विलास जाधव, मतदान कर्मचारी व्यवस्थापन कक्षाचे नोडल अधिकारी उपजिल्हाधिकारी संतोष भोर,प्रशिक्षण व्यवस्थापन कक्षाचे तसेच टपाली मतपत्रिका छपाई कक्षाचे नोडल अधिकारी उपजिल्हाधिकारी उदयसिंह भोसले, साहित्य मागणी व वितरण कक्ष,ओळखपत्र तयार करणे व वितरण कक्षाचे नोडल अधिकारी जिल्हा पुरवठा अधिकारी




स्वाती शेंडे, वाहन व्यवस्थापन पक्षाचे नोडल अधिकारी संतोष राऊत, संगणक सुरक्षा, आय. टी एप्लीकेशन कक्षाचे नोडल अधिकारी जिल्हा सूचना व विज्ञान अधिकारी पुरुषोत्तम रुकमे, मतदान जनजागृती कक्षाच्या नोडल अधिकारी शिक्षणाधिकारी सुधा साळुंखे, कायदा व सुव्यवस्था नोडल अधिकारी जिल्हा पुनर्वसन अधिकारी अरुणा गायकवाड, ईव्हीएम व्हीव्हीपॅट मशीन व्यवस्थापन कक्षाचे नोडल अधिकारी उपजिल्हाधिकारी संतोष राऊत, खर्च सनियंत्रण कक्षाचे नोडल अधिकारी तथा जिल्हा परिषदेचे मुख्य लेखा वित्त अधिकारी सचिन इगे, मतपत्रिका छपाई नोडल अधिकारी तथा कळंब उपविभागीय अधिकारी संजय पाटील, माध्यम व सनियंत्रण कक्षाचे नोडल अधिकारी जिल्हा माहिती अधिकारी विवेक खडसे, समन्वय, दिव्यांग मतदार, मदत व सनियंत्रण कक्षाचे नोडल अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी डी.एम. गिरी, तक्रार निवारण व मतदार मदत कक्ष व नियंत्रण कक्षाचे नोडल अधिकारी जिल्हा नियोजन अधिकारी अर्जुन झाडे, निवडणूक निरीक्षक यांचे नोडल अधिकारी उपमुख्य कार्यकारी अधिकारी सूर्यकांत भुजबळ, सी–सिव्हिल व विविध परवाने नोडल अधिकारी प्रवीण पांडे, अवैध दारू वाटप प्रतिबंध कक्षाचे नोडल अधिकारी तथा राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक गणेश बारगजे, प्रथमोपचार सोयी सुविधा नोडल अधिकारी तथा जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.इस्माईल मुल्ला आदी तर
दूरदृश्यप्रणालीद्वारे बार्शी उपविभागीय अधिकारी, तहसिलदार औसा उपविभागीय अधिकारी, तहसीलदार तसेच जिल्ह्यातील सर्व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी, तहसिलदार, गट विकास अधिकारी व नगर पालिकांचे मुख्याधिकारी आदी उपस्थित होते.

# लघु उद्योजिका विजया चंद्रकांत पाठक यांना परिणिता सन्मान



लातूर , प्रतिनिधि :- जागतिक महिला दिनानिमित्त परिणीता सोशल फाऊंडेशन आयोजित मपरिणीता सन्मानफ २०२४ हा विविध क्षेत्रातील महिलांचा गौरव आणि सन्मान करणारा कार्यक्रम दि. १३ मार्च २०२४ रोजी सायंकाळी भारतीय विद्याभवन, सेक्टर ३१, वाशी नवी मुंबई येथे अत्यंत उत्साहात पार पडला.

महाराष्ट्रातील विविध भागांमधून कार्यरत असलेल्या उद्योजिकाना या निमित्तानं गौरवण्यात आलं.

परिणीता सोशल फाऊंडेशन सन्मान सोहळा २०२४ या कार्यक्रमात आपल्या लातूर मधील लघु उद्योजिका सौ. विजया चंद्रकांत पाठक यांना फूड या क्रायटेरिया परिणिता सन्मानाने मनिरामय वेलनेस सेंटरफच्या माध्यमातून मस्वयंपूर्ण ऊर्जाफ या विषयात कार्यरत असणाऱ्या मा. अमृता चांदोरकर यांच्या हस्ते गौरवण्यात आलं. पापड्या, कुरवड्या, मसाले, लोणचे,अशा सर्व खाद्यपदार्थांमधून नावारूपाला आलेला त्यांचा व्यवसाय मवरद गणेशफ या नावाने लक्ष्मी कॉलनी औसा रोड लातूर येथील त्यांच्या राहत्या घरीच त्यांनी नावारूपाला आणला असून सध्या त्यांच्याकडे सर्व खाद्य पदार्थासाठी मराठवाडा, विदर्भ मुंबई तसेच या।अमेरिकेतून सुद्धा प्रचंड मागणी आहे. सचोटी, सातत्य, प्रामाणिक मेहनत आणि उत्पादनाचा चांगला दर्जा राखणे ही या यशस्वीतेमागची मुख्य कारणे आहेत असे त्यांचे मत आहे. या त्यांच्या यशा बद्दल सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन आणि कौतुक होत आहे.

या कार्यक्रमाविषयी बोलताना परिणीता सोशल फाऊंडेशनच्या संस्थापिका साक्षी सागवेकर आणि श्री प्रशांत सागवेकर यांनी सांगितले की मागच्या तीन वर्षांपासून सातत्याने विविध क्षेत्रात काम करणाऱ्या आणि स्वतःच्या पायावर उभे राहून पुढच्या पिढीसाठी नवा आदर्श निर्माण करणाऱ्या महिलांचा गौरव केला जातो.

या कार्यक्रमास मुंबई महानगरपालिकेच्या माजी महापौर मा. निर्मला सामंत प्रभावळकर, प्रसिद्ध अभिनेत्री आणि चित्रपट निर्मात्या मा. लीना नांदगांवकर, तन्वीशताच्या संचालिका मा. डॉ. मेधा मेहेंदळे, प्रसिद्ध टेलिविजन लेखिका मा. रोहिणी निनावे, मराठी चित्रपट,मालिका क्षेत्रात इव्हेंट मॅनेजमेंट करणाऱ्या मा. मानसी इंगळे, एबीपी माझा वृत्तवाहिनीच्या उपकार्यकारी संपादक मा. सरिता कौशिक, नवी मुंबई महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त मा. सुजाता ढोले आणि निरामय वेलनेस सेंटरच्या माध्यमातून स्वयंपूर्ण ऊर्जा विषयात कार्यरत असणाऱ्या मा. अमृता चांदोरकर अशा आठ नामवंत महिलाआणि सुप्रसिद्ध अभिनेता दिग्दर्शक राजेश देशपांडे हे सहभागी झाले होते.

# विद्यमान खासदार सुधाकर शृंगारे यांच्या कार्यावर पक्षाने विश्वास ठेवून दुसऱ्यांदा उमेदवारी दिली : बस्वराज रोडगे


लातूर / प्रतिनिधी- लोकसभा मतदारसंघात विद्यमान खासदार सुधाकरराव शृंगारे यांनी केलेल्या कार्याची पावती म्हणून केंद्रीय नेतृत्व देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी साहेब ,भारतीय जनता पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा जी ,अमित शहाजी, महाराष्ट्राचे नेते देवेंद्रजी फडणवीस साहेब ,प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखरजी बावनकुळे साहेब ,आमच्या जिल्ह्याचे पालकमंत्री गिरीशजी महाजन साहेब, संजय जी केनेकर साहेब, संजयजी कोडगे साहेब, लोकसभा प्रभारी किरणजी पाटील साहेब, आ.अभिमन्यूजी पवार साहेब ,आ. रमेश आप्पाजी कराड साहेब, जिल्ह्याचे नेते संभाजी भैया पाटील साहेब तसेच निरीक्षक म्हणून आलेले नामदार अतुलजी सावे साहेब ,आमदार सचिन कल्याण शेट्टी साहेब,आमचे लोकप्रिय जिल्हाध्यक्ष दिलीप मालक आणि जिल्ह्यातील सर्व कार्यकर्ते या सर्वांच्या म्हणण्यानुसार शृंगारे साहेबांना दुसऱ्यांदा तिकीट देण्यात आले आहे तरी वरील सर्वांचे मनस्वी आभार आणि धन्यवाद.

ही निवड अगदी सार्थ आहे कारण खासदार साहेबांचा कार्यकाल जेव्हा सुरू झाला त्यावेळी अडीच वर्ष कोरोनाचा काळ त्या पिरेड मध्ये साहेबांनी म्बुलन्स आणि ऑक्सिजन प्लांट जिल्ह्यामध्ये सर्व शासकीय हॉस्पिटलमध्ये जास्तीचे बेड वाढवून कोरोना संकटात कोरोनाग्रस्तांना अतिशय मोलाची मदत केली आहे. आणि त्यांच्या कार्यकालमध्ये गडकरी साहेबांकडून जिल्हाभरात सिमेंट रस्त्यांचे जाळे पसरले आहे. तसेच त्यांच्याकडे दानत असणार हृदय आहे त्यांनी आत्तापर्यंत अनेक गोरगरिबांना स्वखर्चातून अडीअडचणीत भागवले आहेत कुणाला दवाखाना असेल मदत केली आहे.

कुणाच्या ही अनंता अडचणी असतील त्या ठिकाणी ते देवदूत म्हणून थांबले आहेत. खरं तर खासदार साहेबांचा कार्यकाल भारताच्या लोकशाही मधील एक सुवर्णकाळ मानला पाहिजे त्यांच्या कार्यकाला मध्ये ट्रिपल तलाक, त्यांच्याच कार्यकालमध्ये ३७० कलम रद्द करण्यात आली, त्यांच्याच कार्यकाला मध्ये सीएए कायदा लागू झाला. तसेच जे हिंदूच्या अस्मितेचा प्रश्न होता तो म्हणजे प्रभू रामचंद्राचे मंदिराचा गेली पाचशे वर्ष वादात असलेले मंदिर त्यांच्याच कार्यक्रमांमध्ये भव्य दिव्य असे उभारले गेले आणि सकल भारतातील हिंदू आज राम लल्ला चे दर्शन घेत आहे. आम्ही मोदीजी ने दिलेले वचन पाळले आहेत त्यांच्याच कार्यकालमध्ये पाकिस्तान मध्ये घुसून हेअर स्टाईल करून अतिरेकी मारण्यात आले अशा या राष्ट्रीय घटनांचे ते साक्षीदार ते हिस्सेदार आणि ते शिल्पकार बनले आहेत .खर म्हणजे मतदार संघातील साहेबांनी जलजीवन मिशनद्वारे शुद्ध जल देण्याचे भरपूर प्रयत्न केलेत त्यांच्यामार्फत तीन-चारशे गावांना ही योजना मिळाली असून त्या गावांमध्ये फिल्टरचे शुद्ध पाणी मिळत आहे .साहेबांनी लातूर साठी पीठ लाईन मंजूर करून घेतली एवढेच नाही तर लातूरच्या रेल्वे स्टेशनच्या नूतनीकरण साठी कोट्यावधी रुपये उपलब्ध करून दिले .एवढेच नाही तर त्यांच्या कार्यकालमध्ये रेल्वेच्या बोगी कारखान्याला करोडो रुपयांचा निधी त्यांनी प्राप्त करून दिला आहे. रेल्वेच्या फेऱ्या वाढल्या आहेत .साहेबांनी प्रत्येक क्षेत्रात मोलाचे काम केले आहे विशेष म्हणजे श्रंगारे साहेब हे कुठल्याच नेत्याला किंवा कार्यकर्त्याला रुतले नाहीत मातले नाहीत त्यांनी कुणाला कधीच विरोध केला नाही .

सबका साथ, सबका विकास ,सबका विश्वास ! या उक्तीप्रमाणे ते सर्वांना सोबत घेऊन चालणार एक राजकारणातील संत म्हटले तरी वावगं ठरणार नाही असं नेतृत्व आहे .साहेबांच्या डोक्यामध्ये भरपूर योजना आहेत तसेच साहेबांनी लातूर येथील महात्मा बसवेश्वरांच्या पुतळ्याबद्दल स्वतः लक्ष घालून पुतळा जाग्यावरून हलवू नये लिंगायत समाजाच्या भावना त्या पुतळ्याशी जोडले आहेत लिंगायत समाजाला ठेस पोचू नये याची दक्षता घेऊन स्वतः साहेबांनी केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीनजी गडकरी साहेबांकडे माझ्यासहित पंधरा लोकांचे शिष्टमंडळ घेऊन जाऊ हा प्रश्न साहेबांनी नितीनजी गडकरी साहेबांना पुतळा न हलवण्याची विनंती केली आणि गडकरी साहेबांनी जाग्यावरून लातूरच्या शिवना आदेशित करून तो रिंग रोड लातूर अंतर्गत रस्ता म्हणून घेण्याचे आदेशित केले म्हणून तो पुतळा जाग्यावर राहिला हा प्रसंग लातूर जिल्ह्यातील लिंगायत समाज कधीही विसरणार नाही .साहेबांसोबत लिंगायत समाज तन-मन-धनाने सोबत राहील .

दुसरी महत्त्वाची गोष्ट विविध सामाजिक कार्यामध्ये मग रामनवमी असो शिवजयंती असो गणेशोत्सवासो आंबेडकर जयंती असो किंवा अण्णाभाऊ साठे जयंती असो विविध राष्ट्रीय महापुरुषांच्या व नेत्यांच्या कार्यामध्ये ते नेहमी झोपून देऊन योगदान देऊन तन-मन-धनाने कार्य करणार असं नेतृत्व म्हणजे श्रंगारे साहेब आहेत .म्हणूनच या सर्व घटनांच समीक्षण करून पक्षश्रेष्ठींनी त्यांना उमेदवारी दिली त्याबद्दल श्रेष्ठींचे आभार व श्रंगारे साहेबांचे मनस्वी अभिनंदन आणि तसेच श्रृंगारे साहेब यावेळेस गेल्या वेळेस पेक्षा जास्त मताने लातूर जिल्ह्यातील जनता निवडून देईल असा मी ठाम विश्वास देतो.





जागतिक लिंगायत महासभेची कार्यकारणी मीटिंग दिनांक १६ मार्च व १७ मार्च रोजी कुडल संगम येथे पार पडली. या बैठकी च्या अध्यक्षस्थानी सेवानिवृत्त जज्ज कॅम्पेगोडा होते याला जामदार साहेब यांनी मार्गदर्शन केले त्यामध्ये नागमोहन दास कमिटीचा रिपोर्ट व धर्म मान्यतेसाठी केंद्राकडे पाठवलेले प्रस्ताव केंद्र शासनाने त्रुटी काढून परत पाठवले आहे. ते प्रस्ताव पुनश्च केंद्र शासनाकडे पाठवण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. केंद्राची नकारार्थी भूमिका , पंचाचार्यांचा विरोध मोडून काढण्यासाठी सविस्तर चर्चा करण्यात आली. त्यामध्ये जागतिक लिंगायत महासभा, विरक्त मठाधीश, व वीरशैव महासभा यांची संयुक्तरित्या समिती गठीत करून केंद्र शासनावर दबाव आणण्याचे ठरवले. तदनंतर कर्नाटक सरकार कडून सदरचे प्रस्ताव पुनश्च्य केंद्राकडे पाठवण्याचे ठरले या समयी महाराष्ट्रातून पुण्याचे बसवराज कणजे, सिद्धाराम नावादगिरे, प्राध्यापक कल्याणकर, कोल्हापूर जिल्ह्यातील राजशेखर तंबाके सुरेश जांबुरे,विलास आंबोळेसर शंकर बिराजदार सर, रणदिवे सर सांगलीतून तुकाराम माळी सोलापूरहून शिवानंद गोविंदे सर ,बावी थळंगे ताई कर्नाटक राज्यातून प्रत्येक जिल्ह्यातील अध्यक्ष व उपाध्यक्ष ३५० पदाधिकारी होते.

# सुखाचा पासवर्ड

## जीवनविद्या

प्रश्न : समाजात पुष्कळ वेळा आपण पहातो की दुर्जन लोक सुखी जीवन जगतात तर त्याच्या उलट सज्जन माणसे दुःखात खितपत पडलेली असतात. तर मग कर्माचे फासे असे उलटे कसे पडतात ?

उत्तर : दुष्कर्म करणारी दुर्जन माणसे सुखी दिसतात याचा अर्थ ती सुखी असतात असा नाही, किबहुना ती सुखी नसतातच.दुसरा मुद्दा असा की निसर्गाचे नियम जगातील सर्व लोकांना सारखेच लागू असतात व त्याला अपवाद सुद्धा नाहीत. निखाऱ्यावर जर पाय पडला तर तो भाजणारच , तो मनुष्य सज्जन असो किंवा दुर्जन असो. त्याप्रमाणे निसर्गाच्या नियमांना जे लाथाडतात त्यांच्यावर त्यांनीच निर्माण केलेल्या नियतीकडून जीवनात लाथा खाण्याचे प्रसंग येतात.याच्या उलट निसर्गाचे नियम लक्षात घेऊन जे आचरण करतात, त्यांना सुखी जीवनाचा लाभ होतो.तिसरा मुद्दा असा की, जीवनात आपण जी सुख-दुःखे भोगतो, त्या सुख-दुःखांची फळे पूर्वी आपण जी शुभ आणि अशुभ कर्मे केलेली असतात त्यांची फळे असतात.आज आपण जी शुभ-अशुभ कर्मे करतो त्यांची बरी-वाईट फळे आपल्याला भविष्यात मिळणारच असतात. झाड लावले आणि लगेच फळ मिळाले असे कधीच घडत नाही. त्याचप्रमाणे जीवनातही तसाच प्रकार घडत असतो.

**- सद्गुरू श्री वामनराव पै.**



# दयानंद विज्ञानमधील सूक्ष्मजीवशास्त्र विभागातर्फे शैक्षणिक व औद्योगिक सहल

लातूर : येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयातील सूक्ष्मजीवशास्त्र विभागातर्फे दि.१५ मार्च २०२४ वार शुक्रवार रोजी सोलापूर येथे एक दिवसीय शैक्षणिक व औद्योगिक सहल आयोजित करण्यात आलेली होती.

येथील नॅशनल रिसर्च सेंटर ऑफ पोमोग्रनेट,सृजन लिमिटेड फूड ऑफ प्रायव्हेट लिमिटेड,सोलापूर सायन्स सेंटर या विविध ठिकाणी एम.एस्सी.द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांनी भेट दिली. सहलीदरम्यान एनआरसीपीचे रिसर्चर पोकरे यांनी डाळिंबावर होत असलेल्या संशोधनावर माहिती दिली.त्यामध्ये त्यांनी डाळिंबावर वेगवेगळी प्रक्रिया करून आयुष्यमान कसे वाढवले जाते तसेच डाळिंबाच्या प्रत्येक भागाचा म्हणजे बिया,साल याचा वापर करून त्यापासून तेल तयार करण्यात येते व त्याचा उपयोग सौंदर्य प्रसाधने साबणमध्ये कसा वापर केला जातो,याबद्दल सविस्तर अशी माहिती दिली.

यादरम्यान टिश्यू कल्चर लॅब,प्रोसेसिंग युनिट,पॅथॉलॉजिकल लॅब,डाळिंब शेतला भेट देण्यात आली. तसेच सृजन फूड प्रा.लिमिटेड( पार्ले कंपनी) मध्ये सुरुवातीला कंपनीच्या इतिहासाबद्दल एक चित्रफित दाखवण्यात आली.पारले कंपनीचे कोणकोणते प्रोडक्ट आहेत याबद्दल इत्यंभूत माहिती दिली.त्याचबरोबर बिस्कीट कसे तयार केले जातात,तयार करत असताना कोणकोणती काळजी घेतली जाते,बिस्कीटची क्वालिटी कशी तपासली जाते याचेही प्रात्यक्षिक दाखवले,तद्नंतर सोलापूर सायन्स सेंटरला भेट देण्यात आली.

यामध्ये प्राचीनकालीन वस्त्रोद्योग, वस्त्रोद्योगामध्ये नॅनो तंत्रज्ञानाचा उपयोग कसा केला जातो,पदार्थ विज्ञानाशी निगडित विविध संकल्पनेवर आधारित विविध मॉडेल ठेवण्यात आलेले होते.या सहलीला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जयप्रकाश दरगड,उपप्राचार्य सिद्धेश्वर बेल्लाळे व विभाग प्रमुख डॉ.राहुल मोरे यांचे मार्गदर्शन व सहकार्य मिळाले.या शैक्षणिक व औद्योगिक सहलीचे नियोजन पदव्युत्तर समन्वयक प्रा.शितल पाटील यांनी केले होते.डॉ.महेश करळे व माधव सूर्यवंशी याचे सहकार्य लाभले.या सहलीचा एकूण २७ विद्यार्थ्यांनी लाभ घेतला.

# ऑफस्टीकल, बरॅक व ओपन जिमचे मिश्रा यांच्या हस्ते उद्घाटन



धाराशिव दि.१७ (प्रतिनिधी) - पोलीस कल्याण विभाग अंतर्गत धाराशिव पोलीस मुख्यालय येथील कवायत मैदान येथे पोलीसांच्या प्रशिक्षणासाठी व फिटनेससाठी ऑफस्टीकल, ओपन जिम, पुरुष पोलीस अंमलदार व महिला पोलीस अमंलदार यांच्यासाठी बॅरेक सुरु करण्यात आले.

याचा शुभारंभ दि.१६ मार्च रोजी छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक विरेंद्र मिश्रा यांच्या हस्ते व जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधीक्षक गौहर हसन यांच्या उपस्थितीत करण्यात आले. यावेळी पोलीस निरीक्षक मनोजकुमार राठोड, अजिनाथ काशीद, राखीव पोलीस निरीक्षक दुबे आदींसह पोलीस अधिकारी, अमंलदार व कार्यालयीन कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वैज्ञानिक हा नदीच्या प्रवाहाप्रमाणे वेळेनुसार स्वतः मध्ये बदल करणारा हवा: प्रशांतकुमार तिगलपल्ले





लातूर / प्रतिनिधी- उत्तम वैज्ञानिक कसा असतो याचे उदाहरण देताना प्रशांतकुमार तिगलपल्ले यांनी बिजेरींक यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवण्याचा सल्ला दिला. वैज्ञानिक हा नदीच्या प्रवाहाप्रमाणे वेळेनुसार स्वतः मध्ये बदल करण्याची तयारी असणारा हवा तरच तो समोर येणाऱ्या प्रत्येक अडचणीला तोंड देऊ शकेल. वैज्ञानिकांमध्ये संयम व परोपकारवृत्ती असायला हवी. विद्यार्थी हे वैज्ञानिकदृष्ट्या घडण्यासाठी वैज्ञानिकांचा आदर्श समोर ठेवून त्यांच्या पावूलवाटेवर चालत राहले तर नक्कीच चांगले संशोधक ते वैज्ञानिक हा टप्पा पार करू शकतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

दयानंद विज्ञान महाविद्यालयात दि.१६ मार्च २०२४ रोजी जैवतंत्रज्ञान विभागाच्या वतीने वैज्ञानिक मार्टिनस बिजेरिंक यांची १७३ वी जयंती साजरी करण्यात आली. वैज्ञानिकांच्या जयंती निमित्त त्यांच्या कार्यास अभिवादन करण्याचा हा उपक्रम जैवतंत्रज्ञान विभागातर्फे राबवला जातो.

दयानंद विज्ञान महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे, प्रशांतकुमार तिगलपल्ले (वरिष्ठ व्यवसाय विकास अधिकारी, फॉरच्युन क्लाउड टेक्नॉलॉजी, पुणे) जैवतंत्रज्ञान विभाग प्रमुख डॉ. कोमल गोमारे यांनी कार्यक्रमाची सुरुवात वैज्ञानिकाच्या प्रतिमेस वंदन करून केली.

वैज्ञानिक मार्टिनस बिजेरिंक यांची विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रातील कारकीर्द बी.एस्सी. बी.टी. प्रथम वर्षाची विद्यार्थीनी तनुजा लोखंडे यांनी सांगितली.

उपप्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे यांनी यावेळी म्हटले की, बिजेरिंक जरी १९३१ मध्ये आपल्याला सोडून गेले असले तरी त्यांचे कार्य अजरामर आहे, विविध वैज्ञानिकांच्या संशोधनवृत्तीचा वारसा आज विज्ञानाचे विद्यार्थी पुढे चालवत आहेत व जैवतंत्रज्ञान विभागाचा हा उपक्रम त्यादृष्टीने चांगले कार्य करत आहे, याबाबत समाधान व्यक्त करून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकास व प्रगतीसाठी शुभेच्छा दिल्या.

मार्टिनस बिजेरिंक डच सूक्ष्मजीवशास्त्रज्ञ आणि वनस्पतिशास्त्रज्ञ होते जे विषाणूशास्त्र आणि पर्यावरणीय सूक्ष्मजीवशास्त्राच्या संस्थापकांपैकी एक होते. त्याला विषाणूंच्या सह-शोधाचे श्रेय दिले जाते, ज्याला त्यांनी कॉन्टेजियम व्हिव्हम फ्लुइडम म्हटले. बिजेरिंकने नायट्रोजन फिक्सेशन देखील शोधून काढले, ही प्रक्रिया ज्याद्वारे डायटॉमिक नायट्रोजन वायूचे अमोनियममध्ये रूपांतर होते आणि वनस्पतींसाठी उपलब्ध होते. जमिनीचा पोत सुधारण्यासाठी याचा उपयोग होत असतो.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जयप्रकाश दरगड यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झालेल्या या कार्यक्रमासाठी जैवतंत्रज्ञान विभागातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. तसेच विद्यार्थ्यांच्या जैवतंत्रज्ञान मंचचे सदस्य प्रा.स्वरूप गावकरे व प्रा. श्रीनिवास कुलकर्णी आणि विद्यार्थी मंचचे पदाधिकारी विद्यार्थी तसेच विभागातील पदवी व पदव्युत्तर वर्गाचे विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

# आ. धीरज देशमुख यांनी दिलेल्या आश्वासनाची पूर्तता

## रेणापूर बाजार समितीकडून जनावरांचा बाजार सुरू



**लातूर / प्रतिनिधी-** रेणापूर कृषि उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीमध्ये लातूर ग्रामीणचे आमदार धीरज विलासराव देशमुख यांनी बाजार समितीकडून जनावरांचा बाजार सुरू करण्याचे आश्वासन दिले होते त्या आश्वासनाची पूर्तता करत रेणापूर येथील कृषि उत्पन्न बाजार समितीने पुढाकार घेवुन लातुर ग्रामीणचे आमदार धिरज विलासराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली शुक्रवार दि १५ रोजी जनावरांचा बाजारांचा शुभारंभ बाजार समितीचे सभापती उमाकांत खलंग्रे उपसभापति अँड शेषराव हाके सन्माननीय संचालक मंडळ यांच्या हस्ते शेतकरी, व्यापारी यांच्या उपस्थितीत करण्यात आला यामुळें रेणापूर तालुक्यातील पशू मालकांना मोठी मदत होणार आहे दिलेल्या शब्दाची पूर्तता केल्याबद्दल या तालुक्याचे आमदार धीरज विलासराव देशमुख यांचे तालुक्यातील शेतकरी, व्यापारी बांधव यांचेकडून कौतुक केले जात आहे

लातूर जिल्ह्यातील रेणापूर येथील जनावरांचा बाजार मराठवाडयात प्रसिद्ध होता परंतु बाजारात व्यापारी शेतकरी यांच्यासाठी आवश्यक असणाऱ्या सोयी सुविधा नसल्याने हा बाजार मोडकळीस आला होता जनावरांच्या बाजाराचे गतवैभव पुन्हा प्राप्त करण्यासाठी लातुर ग्रामीणचे आमदार धिरज देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली येथील कृषि उत्पन्न बाजार समितीच्या संचालक मंडळाने जनावरांच्या बाजारासाठी आवश्यक असणाऱ्या सुविधा देण्यासह बाजार सुरू करण्यासाठी तयारी केली होती त्यानुसार शुक्रवारि यापूर्वी ज्या ठिकाणी बाजार भरत असलेल्या ठिकाणीच जनावरांच्या बाजारांचा शुभारंभ करण्यात आला यावेळी सभापती उमाकांत खलंग्रे , उपसभापती अॅड . शेषेराव हाके पाटील संचालक जनार्धन माने , कमलाकर आकनगिरे अॅड. शिरीष यादव,प्रवीण माने, अॅड. मुरलीधर पडोळे, विश्वनाथ कागले, प्रकाश सुर्यवंशी,अमर वाकडे प्रमोद कापसे, राजाभाऊ साळुंके, बाळकृष्ण खटाळ , उमेश सोमानी , प्रदिप काळे ,सचिन इगे , शहाजी पवार यांच्यासह शेतकरी, व्यापारी आदी मान्यवर होते

बाजाराला गतवैभव प्राप्त करण्यासाठी बाजार समितीचा पुढाकार

रेणापूर शहरात पुर्वी बाजार भरत होता मात्र सुविधे अभावी बंद होता याकडे आमदार धीरज देशमुख यांनी स्वतः लक्ष घालून जनावरांचा बाजार सुरू करण्याचे आश्वासन निवडणुकीत दीले होते त्या आश्वासनाची पूर्तता संचालक मंडळाने केली आहे त्यानूसार नूतन बाजार जनावरांच्या बाजारांचा शुभारंभ झाला आहे . यावर्षी येथील कृषि उत्पन्न बाजार समितीने पुढाकार घेवुन बाजारात पाण्याची सोय व तात्काळ दाखला नोंदणी व जनावारांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था व्यापाऱ्याना राहण्यासाठी निवासस्थानाची सोय ही करण्यात येणार असल्याची माहिती बाजार समितीचे सभापती उमाकांत खलंग्रे यांनी यावेळी बोलताना दिली यामुळें व्यापारी व शेतकरी वर्गातून समाधान व्यक्त करण्यात येत आहे . अशा सोयी सुविधा उपलब्ध करून दिल्याने बाजाराला नक्कीच गतवैभव मिळेल, असा विश्वास व्यापारी वर्गातून व्यक्त करण्यात आला असून आमदार धीरज विलासराव देशमुख यांचे व्यापारी शेतकरी बांधव यांचेकडून आभार व्यक्त करण्यात आले.

हे पत्र मालक, मुद्रक व प्रकाशक **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** यांनी मे. यशवंत प्रिंटींग प्रेस, ५१, एमआयडीसी, लातूर येथे छापून दैनिक यशवंत कार्यालय, गांधी मार्केट, लातूर येथे प्रसिध्द केले. शहर कार्यालय-गांधी मैदान, लातूर,दूरध्वनी-२४६९४६, मुख्य कार्यालय -५१, एमआयडीसी, लातूर, दूरध्वनी-२२०२४६,फॅक्स(०२३८२)२२०१४१, उस्मानाबाद कार्यालय दूरध्वनी-(०२४७२)२२८९१२, सोनवणे : ९४०२९ ४९६०७ परभणी कार्यालय - दूरध्वनी - २२१४५३, उदगीर कार्यालय-(०२३८५) २५३९९८.राम मोतीपवळे : ८५०२२८२४० (अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखातील विचाराशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
संस्थापक संपादक-**प्रा.बी.व्ही.मोतीपवळे,** संपादक - **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** ईमेल : dailyyashwant@gmail.com, omj7@rediffmail.com

यशवंत धाराशिव जिल्हा
मंगळवार दि. १९ मार्च २०२४

कार्यालय/फॅक्स : ०२४७२-२२८९१२, E-mail malikarjun.sonawane@gmail.com

## सूरजपाशा यांनी ५० मुला-मुलींना कपड्याचे केले वाटप

धाराशिव दि.१८ (प्रतिनिधी) – पवित्र रमजान महिन्यातील उपवास सुरु आहेत. दिनाला महत्त्व असल्यामुळे माजी उपसरपंच सुरजपाशा शेख यांनी ५० मुला-मुलींना कपड्यांचे वाटप केले आहे. धाराशिव तालुक्यातील कसबे तडवळा येथील माजी उपसरपंच सुरजपाशा शेख यांनी हजरत भैरुल्लाहशाह कादरी रहे दर्गाह येथे मुला-मुलींना कपडे वाटप करण्यात आले. यावेळी शकील मौलाना, रिजाझ कोरबु, इकबाल टेलर आदींसह नागरिक मोठ्या उपस्थित होते.



# लोकसभेसाठी उस्मानाबाद विधानसभा क्षेत्रात ३ लाख ६४ हजार मतदार – पाटील

धाराशिव दि.१८ (प्रतिनिधी) – उस्मानाबाद लोकसभा मतदारसंघाच्या मतदानाची तयारी करण्यासाठी प्रशासन कामाला लागले आहे. उस्मानाबाद विधानसभा मतदारसंघांमधील ३ लाख ६४ हजार २०१ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. यामध्ये पीडब्ल्यूडी ४०७९ तर ज्येष्ठ नागरिक ८ हजार १९७ असल्याची माहिती कळंब विभागाचे उपविभागीय अधिकारी तथा सहाय्यक जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी संजय पाटील यांनी दि.१८ मार्च रोजी दिली. धाराशिव तहसील कार्यालयाच्या सभागृहात उस्मानाबाद लोकसभा निवडणूक संदर्भात आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी तहसिलदार डॉ मृणाल जाधव, प्रभारी तहसिलदार निलेश काकडे आदी उपस्थित होते. पुढे बोलताना पाटील म्हणाले की, उस्मानाबाद विधानसभा मतदार संघामध्ये शहरी भागात १०६ ग्रामीण भागात ३०४ मतदान केंद्रे तर शहरी व ग्रामीण भागातील मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांची संख्या देखील तितकीच असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच महिला (वुमेन) मतदान केंद्र क्र.- ३०१ हे तर युवक (युथ) मतदान केंद्र क्र.-३०४ व पीडब्ल्यूडी मतदान केंद्र क्र.- ३०८ तर पडदानशीन मतदान केंद्र क्र.- ४२ तर क्रिटिकल मतदान केंद्र क्र.- २९१ व १४६ तसेच यासाठी मनुष्यबळ अनुक्रमे ४+४, ४+४, ४-४, ४२ व ८ लागणार असल्याचे त्यांनी सांगितले. तर मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी असे एकूण १८०४ कर्मचारी नियुक्त करण्यात येणार आहेत. यासाठी झोनल ऑफिसर ४३+३ एकूण ४७ तर मास्टर ट्रेनर्स ४३+४



एकूण ४७ व मायक्रो ऑब्झर्वर १८२ असणार आहेत. तसेच व्हीएसटी – २, व्हीव्हीटी – २, एसएसटी २४ व एफएसटी ११ अशी एकूण ३९ पथके तैनात करण्यात येणार आहेत. तसेच स्पॉट अनुक्रमे २, २, ८ व ७ अशी एकूण १९ तर यासाठी अनुक्रमे ८, ८, ४८ व ४४ असे एकूण १०८ कर्मचारी नियुक्त करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

**एखादा कर्मचारी एप्रिल किंवा मे महिन्यामध्ये सेवानिवृत्त होणार असेल अशा कर्मचाऱ्यांना निवडणुकीचे काम सोपविले जाणार नाही. तसेच बायपास सर्जरी किंवा इतर गंभीर आजार असलेल्या कर्मचाऱ्यांना देखील या निवडणुकीसाठी कुठल्याही प्रकारची जबाबदारी देण्यात येणार नसून वरीलपैकी व्याधींनी ग्रस्त असलेल्या कर्मचाऱ्यांनी जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी किंवा सहाय्यक जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे संपर्क साधून योग्य ती कागदपत्रे सादर करावीत असे आवाहन पाटील यांनी केले.**

**दिव्यांग व ८५ वर्षे वयाच्या पुढील मतदारांना आपल्या मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी त्यांच्या घरी संबंधित बीएलओ जाऊन मतदानाचा अर्ज भरून घेतील. तसेच त्यांना त्यांच्या घरी मतदान करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आले असल्याचे त्यांनी आवर्जून नमूद केले.**

## शिर्डी व सोलापूर या लोकसभा रिपाइंला सोडा – बनसोडे

परंडा दि.१८ (प्रतिनिधी) – शिर्डी व सोलापूर या दोन लोकसभा मतदार संघावर महायुतीतील रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) चा हक्क असून या दोंन्ही जागा रिपाइंला सोडण्यात याव्यात. तसेच शिर्डी लोकसभा मतदारसंघाची उमेदवारी रिपाइंचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांना देण्यात यावी. जर या दोन जागा सोडल्या नाहीत तर आम्ही वेगळा विचार करू असा इशारा रिपाइंचे प्रदेश चिटणीस संजयकुमार बनसोडे यांनी




दि.१८ मार्च रोजी दिला आहे. परंडा शहरातील डॉ .बाबासाहेब आंबेडकर चौकातील रिपाइंच्या पक्ष कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी आयटी सेलचे जिल्हाध्यक्ष आकाश बनसोडे, तालुका संपर्कप्रमुख दादा सरवदे, संजीवन भोसले, संदीप दाभाडे, तात्या शेलार आदी उपस्थित होते. पुढे बोलताना बनसोडे म्हणाले की, पक्षाने महायुतीकडे ४ जागांची मागणी केली असून यामधील प्रामुख्याने शिर्डी व सोलापूर हे दोन्ही लोकसभा मतदारसंघ आरक्षीत आहेत. तसेच या मतदार संघात पक्षाची ताकद मोठी आहे. त्यामुळे रिपाइंसाठी या दोन्ही जागा महायुतीतील मित्रपक्षांनी द्याव्यात. अन्यथा वेगळा विचार केला जाईल असा इशारा त्यांनी दिला.

## युथ फेस्टिवलमध्ये पर्यटन जनजागृती संस्थेच्या माहिती चित्राचे पर्यटन दालन

तुळजापूर दि.१८ (प्रतिनिधी) – येथील टाटा इन्स्टिट्यूटच्या युथ फेस्टिवलमध्ये पर्यटन जनजागृती संस्थेचे दालन उपलब्ध करून देण्यात आले. धाराशिव जिल्ह्यातील पुरातत्वीय व पर्यटन स्थळाविषयी माहिती चित्र प्रदर्शन भरविण्यात आले आहे. या फेस्टिवलमध्ये क्रिकेट, कॅरेम, आरोग्य, डान्स स्पर्धा आदींसह विविध कला सादर केल्या जात आहेत. दूरदूरहुन येणाऱ्यांसाठी पर्यटन जनजागृती समितीच्यावतीने उपलब्ध झालेली माहिती चित्र




प्रदर्शन लाभदायक ठरणार असून जिल्ह्याच्या पर्यटन स्थळांकडे पर्यटकांची संख्या वाढावी. जिल्ह्याचे पर्यटन जागतिक पर्यटन स्थळांवर येण्यासाठी सातत्याने प्रयत्न करीत आहे. समितीच्यावतीने टाटा इन्स्टिट्यूटचे सामाजिक कार्यकर्ते गणेश चादरे, आनंद भालेराव व विद्यार्थ्यांना भारतीय संविधान अमृत महोत्सवी वर्षानिमित्त संविधान उद्देशिकेची प्रत व पर्यटन स्थळाविषयी माहिती पत्रक देऊन शुभेच्छा दिल्या. यावेळी समितीचे अध्यक्ष युवराज नळे, सचिव देविदास पाठक, डॉ अभय शहापुरकर, सदस्य प्रा.अभिमान हंगरगेकर, सहसचिव अब्दुल लतिफ, कार्याध्यक्ष रणजित रणदिवे, उपाध्यक्ष गणेश वाघमारे, कोषाध्यक्ष बाबासाहेब गुळीग, राजाभाऊ कारंडे, विजय गायकवाड, बापु बनसोडे आदींसह विद्यार्थी, शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते.

## मागील ४ वर्षात महामार्गावरील शेकडो प्रवाशांच्या मृत्यूस जबाबदार कोण ? – बिराजदार

उमरगा दि.१८ (प्रतिनिधी) – मागील पाच वर्षात महामार्ग क्रमांक ६५ वर झालेल्या शेकडो प्रवाशांच्या मृत्यूस कोण जबाबदार आहे ? असा सवाल राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष सुरेश बिराजदार यांनी खासदारांना केला आहे. तसेच महामार्गाच्या निकृष्ट कामासह एमआयडीसी, रेल्वे मार्ग, जिल्ह्यात न आलेले मोठे प्रकल्प किंवा उद्योग याविषयीही प्रश्न उपस्थित करीत खा ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांच्यावर दि.१८ थेट निशाणा साधला आहे.

उमरगा येथे पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी भारतीय जनता पक्षाचे माधव पवार, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष बाबा जाफरी, साहेबराव पाटील, शमशोद्दीन जमादार आदी उपस्थित होते. पुढे बोलताना बिराजदार म्हणाले की, मागील ७ ते ८ वर्षापासून आम्ही महामार्गाच्या निकृष्ट कामाबाबत आणि विविध मागण्यांसाठी रस्त्यावर उतरून आंदोलन करीत आहोत. अशी स्थिती असतानाही आमच्या आंदोलनानंतर मागील वर्षी अचानक काम अर्धवट स्थितीत असल्याने खासदारांनी ४-५ दिवस टोल बंदचा स्टंट करून पुन्हा लगेच कुठल्या आधारावर टोल चालू केला ? याचे गौडबंगाल काय आहे ? अद्यापही या महामार्गाची अवस्था जैसे थे आहे आणि टोल वसुली जोमात सुरू आहे. या महामार्गावरती मागील ५ वर्षांत शेकडो प्रवाशांचा



मृत्यू झालेला आहे. मी प्रत्येकाचा फोन उचलतो असे सांगत फिरणाऱ्या खासदारांनी मागील ५ वर्षांच्या आपल्या कार्यकाळात अनेकांचे कुटूंब उध्वस्त करणाऱ्या या गंभीर प्रश्नाकडे का लक्ष दिले नाही ? असा प्रश्न विचारला आहे. ज्या जनतेने तुम्हाला खासदार म्हणून निवडून दिले आहे. त्या मतदारसंघातील बेरोजगार युवकांसाठी एखादा मोठा प्रकल्प ही आपणाला ५ वर्षांत आणता आला नाही अशी खोचक टीका केली आहे. तसेच जिल्ह्यातील एमआयडीसीची दुरावस्था, नवीन उद्योगांना बसलेली खीळ याला जबाबदार कोण? धाराशिव जिल्ह्यातील नागरिकांची अनेक वर्षापासून सोलापूर – उमरगा – हुमनाबाद या रेल्वे मार्गाच्या मागणीसाठी खासदार म्हणून आपण कुठलीही भूमिका घेतलेली नाही. धाराशिव जिल्ह्याच्या विकासासाठी हा रेल्वे मार्ग होणे अत्यंत महत्त्वाचे होते. कागदी घोडे नाचवण्या पलीकडे व फोन उचलतो हे सांगण्या पलीकडे आपण खासदारासारखे जबाबदारीचे पद जिल्हा विकासापासून वंचित ठेवून वाया घातले नाही का ? असा सवाल बिराजदार यांनी विचारला आहे.

## डीबीए समूह डॉ. आंबेडकरांची जयंती विविध कार्यक्रमांनी साजरी करणार

परंडा दि.१८ (प्रतिनिधी) – येथील डीबीए समूहच्यावतीने भारतरत्न, विश्वरत्न, बोधिसत्व, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची १३३ वी जयंती विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी साजरी करण्यात येणार आहे. डी.बी.ए. समूहाचे संस्थापक अध्यक्ष दयानंद बनसोडे यांच्या अध्यक्षतेखाली डीबीए समूह कार्यालय कुर्डूवाडी रोड येथे बैठक घेऊन १४ एप्रिल रोजी आठवडा बाजार येथे जयंती साजरी करण्यात येणार आहे. यावेळी जयंती कमिटीच्या अध्यक्षपदी महावीर बनसोडे यांची तर उपाध्यक्षपदी अमर गायकवाड यांची निवड करण्यात आली. या बैठकीमध्ये ठराव घेऊन डॉ बाबासाहेब आंबेडकर डी बी ए बचत गट काढण्याचे ठरले. निराधार महिलांसाठी साडी वाटप, गोरगरीब हुशार गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांसाठी स्कूल बॅग, वही, पेन आदी



शालेय साहित्याचे वाटप, रुग्णांना फळांचे वाटप व इमारत बांधकाम कामगार महामंडळाच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती व मार्गदर्शन केले जाईल. पोलीस पाटील दिलीप परिहार, ऍड दयानंद धेंडे, पत्रकार रणधीर मिसाळ, सरपंच चंद्रकांत परिहार, बौद्धाचार्य मनोज सिंगनाथ, वंचित बहुजन आघाडीचे प्रदीप परिहार, सतीश दाभाडे, संभाजी थोरात, दयानंद दाभाडे, आभिमान सुतार, धम्म संदेश परिहार, आदींसह नागरिक उपस्थित होते.


# जिल्ह्यातील गट सचिवांचे पगार १५ महिन्यांपासून रखडले !

तुळजापूर दि.१८ (प्रतिनिधी) – जिल्ह्यातील २७० सोसायट्यांचा कारभार फक्त ४७ गट सचिव हाकीत आहेत. सोसायटीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना देखील त्यांची मोलाची मदत होत आहे. मात्र त्याच गट सचिवांचे मागील १५ महिन्यांपासून वेतन रखडले आहे. या गट सचिवांच्या व्यवस्थित कारभारामुळे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचा कारभार व चेअरमन व्हाईस चेअरमन तसेच सदस्य म्हणून मिळविणाऱ्या राजकीय मंडळींना कोणतेच सोयर सुतक नसल्याचे दिसून येत आहे. कारण गट सचिवांना पगार मिळतो का नाही याकडे देखील ही मंडळी पाहण्यास तयार नाही. त्यामुळे त्यांच्या कुंटुंबांस उपासमारीला सामोरे जावे लागत आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनयम १९६० चे कलम ७९ (१) अन्वये दिलेले निर्देश दिनांक ६ डिसेंबर २०१० आणि सुधारित निर्देश दि. १५ मार्च २०२३ चेतंतोतंत पालन करून जिल्ह्यातील गट सचिव व संस्था सचिव यांचे वेतन करण्याची मागणी गट सचिवांनी विभागीय सहनिबंधक सहकार संस्था लातूर यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

दिलेल्या निवेदनात असे नमूद करण्यात आले आहे की, महाराष्ट्र व धाराशिव जिल्ह्यात त्रिस्तरीय कृषी पत पुरवठा संरचना कार्यरत असताना उस्मानाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने त्यांच्याकडील संचालक मंडळ सभा दिनांक १५ जुलै २०२२ मधील ठरावान्वये दि. ३१ ऑक्टोबर २०२२ रोजीच सविस्तर परिपत्रकान्वये अल्प मुदत पीक कर्ज वितरणा संदर्भाने बँकेमार्फत थेट कृषी कर्ज पुरवठा करण्यासाठी परिपत्रक काढून सध्या अस्तित्वात असलेल्या विविध कार्यकारी विकास सेवा सोसायटी संस्थेचे चालू बाकीदार सभासदाचे पीक कर्ज सोसायटीकडून जिल्हा बँकेकडे वळवून जिल्हा बँकेमार्फत थेट कर्ज वितरण करण्याचे धोरण प्रस्तावित केले होते. त्या विरोधात जिल्ह्यातील वि.का. से.सो. संस्थाचे चेअरमन, गट सचिव व संस्था सचिव यांनी आपणाकडे या थेट कर्ज वितरणाचे परिपत्रक रद्द करावे अशी मागणी केली. तसेच धाराशिव येथील जिल्हा बँक व जिल्हा उपनिबंधक कार्यालय येथे आंदोलन केले होते. नंतर वाढता विरोध आणि आपल्या कार्यालयाकडून दिलेल्या सूचनेनुसार जिल्हा बँकेने त्यांच्याकडील संचालक मंडळ सभा दि.२ फेब्रुवारी २०२३ मधील विषय क्र.३० आणि परिपत्रक दि. २ फेब्रुवारी २०२३ अन्वये रद्द केले होते. मात्र ते थेट कर्ज वितरणास केलेल्या विरोधाचा व आंदोलनाचा राग मनात धरून बँकेने त्यांच्याकडील संचालक मंडळ सभा दि.२९ मार्च २०२३ मध्ये गट सचिव व संस्था सचिव यांची पगार वर्गणी सीसी जी की जुलै २०२२ पासून २ टक्याप्रमाणे होती, ती कमी केलेली आहे. तसेच नव्याने सीसी मंजूर करताना जुनी उचल असलेली सीसी भरणा करून घेतली नसल्यामुळे चालू वसुलीतून देण्यात येणारा २ टक्के गाळा जुन्या सीसीमध्ये जात असल्यामुळे गट सचिव व संस्था सचिव यांचे गेल्या १५ महिन्यांपासून वेतन झालेले नाही. तसेच गट सचिव यांचा १० महिन्यांचा पी.एफ. भरणा करण्यात आलेला नाही. दि.९ जून २०२३ रोजी जिल्हा उपनिबंधक यांच्या दालनात झालेल्या चर्चेनुसार ३० जून झाला की सर्व वेतन देण्यात येईल असे बँकेचे चेअरमन, जिल्हा उपनिबंधक आणि बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या समक्ष ठरले होते. त्यानुसार २०५ कोटी रुपयांपैकी १५० कोटी रुपये पीक कर्ज वसूल व वाटप करण्यात आलेले आहे. तर उर्वरित ५५ कोटी रुपये जिल्हा बँकेने व्याजाच्या रकमेची रोखीने सक्ती केलेली व कर्ज वाटप तसेच वसुलीच्या धोरणामुळे वसुली झाली आहे. मात्र अद्याप वेतन अदा झालेले नाही. जिल्हा उपनिबंधक कार्यालयाकडून पगारा संदर्भात ठोस भूमिका घेण्यात आली नसून केवळ तोंडी आश्वासने देण्यात आलेली आहेत. तसेच कोणताही पत्रव्यवहार करण्यात आलेला नाही.या बाबत जिल्हा बँकेचे चेअरमन यांना भेटल्यावर जिल्हा बँक अडचणीत आहे, पैसे नाहीत असे सांगतात. तर जिल्हा उपनिबंधक यांना भेटले असता चेअरमन यांची भेट घेऊन

सीसी लिमिट वाढवायचे बोलू. मात्र चेअरमन यांची भेट होत नाही, असे वेळोवेळी सांगण्यात आलेले आहे. जिल्हा बँक अडचणीत आहे असे सांगितले जाते. मात्र जिल्हा बँकेचे कर्मचारी यांच्यासाठी वार्षिक १४ कोटी रुपये खर्च करू




शकणाऱ्या जिल्हा बँकेकडे गट सचिव व संस्था सचिव यांच्या वेतनासाठी वार्षिक ३ कोटी रुपये जिल्हा बँकेकडे नाहीत. बँकेकडे त्यांच्या कर्मचाऱ्यांच्या नोहेंबर २०२४ अदा केले असून त्यासाठी रक्कम आहे. मात्र गट सचिव व संस्था सचिव यांच्या डिसेंबर २०२२ पासूनचे वेतनासाठी रक्कम नाही. हे निश्चितच हास्यास्पद व खेदजनक आहे. तो पगार कार्यकारी संचालक जाणीवपूर्वक पगार करीत नसल्याचा आरोप गट सचिवांमधून केला जात आहे.त्यामुळे जिल्ह्यातील गट सचिव व संस्था सचिव यांचे वेतन अदा करण्यासाठी संबंधितास योग्य ते निर्देश देण्यात यावेत, अशी मागणी केली आहे. या निवेदनावर बी.सी. रणदिवे, महावीर तांबे, मंगल चवळे, नितीन गोडसे, बी.बी. सुरवसे यांच्यासह ५१ गट सचिवांच्या सह्या आहेत.

# आदर्श आचारसंहितेची काटेकोरपणाने अंमलबजावणी करणार

देगलूर (प्रतिनिधी): भारत निवडणूक आयोगाने घोषित केलेल्या निवडणूक कार्यक्रमानुसार नांदेड लोकसभा मतदारसंघामध्ये २६ एप्रिल २०२४ शुक्रवार रोजी मतदान होणार आहे. निवडणूक कार्यक्रम घोषित झाल्यापासूनच जिल्ह्यात आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. आदर्श आचारसंहितेची अंमलबजावणी करून निवडणूक शांततामय आणि पारदर्शक वातावरणात पार पाडण्यासाठी जिल्हा निवडणूक यंत्रणा सज्ज असल्याचे बिलोली येथील उपविभागीय अधिकारी तथा देगलूर - बिलोली विधानसभा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी सचिन गिरी यांनी सोमवारी झालेल्या पत्रकार परिषदेत सांगितले. तसेच यावेळी मतदनाची टक्केवारी वाढविण्यासाठी विविध उपक्रम हाती घेण्यात आल्याचे सांगितले.



दि. १८ मार्च सोमवार रोजी दुपारी एक वाजता देगलूर तहसील कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत तहसीलदार राजाभाऊ कदम, तहसीलदार श्रीकांत निळे, देगलूर निवडणूक विभागाचे नायब तहसीलदार संजय नागमवाड,बिलोली येथील निवडणूक विभागाचे नायब तहसीलदार दिपक मरळे , मीडिया कक्षातील सहाय्यक नरहरी कोलगाणे, शिवानंद स्वामी , संतोष हेड्डे यांच्यासह प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

नांदेड लोकसभा मतदारसंघात १४ मार्च २०२४ रोजीच्या आकडेवारीनुसार (९०) देगलूर - बिलोलीत महिला - ०१ लाख ४७ हजार ११८, पुरुष - ०१ लाख ५५ हजार ९६८ तर तृतीय पंथी १४ असे एकूण ०३ लाख ०३ हजार १०० मतदार असून नवीन मतदारांची नोंदणी ७३१४ झाली आहे. त्यात नवीन दिव्यांग ३६८ मतदारांची नोंदणी तर दि. १४ मार्च रोजी पर्यंतचे एकूण दिव्यांग मतदार २६४२ आहेत, तर ८५ वर्षे वयाच्या वरील वयोवृद्ध मतदार ४१९८ आहेत. देगलूर - बिलोलीत एकूण ३४८ मतदान केंद्रांवर मतदान होणार आहे.. देगलूर मध्ये १७ तर बिलोली मध्ये १२

असे एकूण २९ क्षेत्रिय अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

या नांदेड लोकसभा मतदारसंघात समाविष्ट असलेल्या (९०) देगलूर विधानसभा मतदारसंघांत अद्यावत मतदार केंद्र राहणार असून मतदान केंद्राच्या ठिकाणी महिला संचलित मतदान केंद्र, दिव्यांग संचालित मतदान केंद्रासह महत्त्वाच्या गरजा पूर्तता करण्याचा प्रयत्न राहील आणि लोकसभा निवडणूक लढविणारे उमदेवार, राजकीय पक्षांना प्रचारासाठी वाहन परवाना, उमेदवाराचे प्रचार कार्यालय, सभा, लाउडस्पीकर व इतर अनुषंगिक बाबींसाठी घ्यावयाच्या परवान्यासाठी एक खिडकी कक्ष देगलूर व बिलोली तहसील कार्यालय येथे स्थापन करण्यात आले असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

निवडणूक काळात कायदा व सुव्यवस्था, आदर्श आचारसंहिता, मनुष्यबळ व्यवस्थापन, निवडणूक खर्च, तक्रार निर्वाण, स्वीप, माध्यम प्रमाणीकरण आणि संनियंत्रण समिती यासह विविध अनेक पथके स्थापन करण्यात आली आहेत. तसेच (९०) देगलूर - बिलोली मतदार संघात देगलूर ०३ बिलोली ०३ असे एकूण ०६ भरारी पथके, देगलूर आरटीओ कार्यालय परिसरात, हणेगाव, भुतन्नहिप्परगा, सांगवी उमर, येसगी, नागणी आदी ठिकाणी स्थिर पथके तैनात करण्यात आले, व्हिडीओ पथके देगलूर ०३, बिलोली ०३ असे एकूण ०६ पथके आणि व्हिडिओद्वारे तपासणी पथके ०६ हे उमेदवारांच्या प्रचारावर निगराणी करण्यासाठी स्थापन करण्यात आली असल्याचे उपविभागीय अधिकारी सचिन गिरी यांनी सांगितले. गतवेळी मतदान कमी झालेल्या मतदान केंद्रासह इतर मतदान केंद्रावर लक्ष केंद्रित करून मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी प्रयत्न सुरु करण्यात आले आहेत. तसेच निवडणूक शांततामय वातावरणात पार पाडण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय करण्यात येत असल्याचेही त्यांनी सांगितले.

नांदेड लोकसभा मतदारसंघाचा निवडणूक कार्यक्रम भारत निवडणूक आयोगाने घोषित केलेल्या लोकसभा सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रमानुसार नांदेड लोकसभा मतदारसंघाची अधिसूचना २८ मार्च २०२४ गुरुवार रोजी प्रसिद्ध होणार आहे. दि. २६ एप्रिल २०२४ शुक्रवार रोजी मतदान होणार असून मतमोजणी ०४ जून २०२४ मंगळवार रोजी होणार असल्याची माहिती यावेळी दिली.



# वायगाव येथे स्वीप कार्यक्रम संपन्न

वायगाव - वायगाव येथे आगामी लोकसभा निवडणूकांच्या पार्शवभूमीवर निवडणूक आयोगाच्या निर्देशा नुसार उपविभागीय अधिकारी सुशांत शिंदे यांच्या सूचनेनुसार व तहसिलदार राम बोरगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली मतदार जागरुकता आणि सहभाग (स्वीप ) कार्यक्रम घेण्यात आला . या कार्यक्रमामध्ये मतदान कर्तव्य बजावणे, नविन मतदार नोंदणी , वगळणे, मयत, स्थलांतरित, मतदाराची यादि वाचन, ऑनलाईन मतदार नोंदणी , होम वोटिंग बद्दल माहिती देण्यात आली . यावेळी मंडळ अधिकारी पंडित जाधव, सरपंच काशिबाई दत्तू कांबळे, उपसरपंच नरसिंग पाटिल, तलाठी संतोष पाटिल, माधव गायकवाड, अविनाश बेळकुंदे, सत्तार शेख, बाळासाहेब जांभळे, बीएलओ नागमवाड, व समस्त गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते .

## जाहीरनामा

किरकोळ अर्ज क्र. ११३/२०२३ निशाणी

कांताबाई प्र. सुधाकर बिरादार ज्यापेक्षा वडील आई नाने आमृत पि. बाबाराव बिरादार व आई निल्लमा भ्र. आमृतराव बिरादार हे दिनांक ०४/०६/२०२१ व दिनांक ०१/०८/२०२१ रोजी मौजे वलांडी ता.देवणी जि.लातूर येथे मयत झालेले आहेत .त्यांचे वारसदार खालिलप्रमाणे आहेत.

१)रमेश पि. अमृतराव बिरादार,--६५--मुलगा
२)सुरेश पि. अमृतराव बिरादार,वय,५५,---मुलगा
३)उमेश पि. अमृतराव बिरादार,वय--५२,--मुलगा
४)शांताबाई भ्र.बाबुराव उर्फ राचप्पा नुत्ते (मयत) मयताचा वारस आकश पि. बाबुराव उर्फ राचप्पा नुत्ते,--वय ४२,--नातू
५)अंत्याबाई भ्र. बाबुराव खारीवाले, वय--६२,--मुलगी
६)भारतबाई भ्र.. शिवकुमार पाटील,--वय--५५,--मुलगी
७)कांताबाई भ्र. सुधाकर बिरादार,वय ६०,--मुलगी
७)शामलबाई भ्र. विरभद्र बिरादार,वय-५८,--मुलगी

यांनी या कोर्टात सदरहू मयताचे Heirship certificates/ वारसा प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज केला आहे.त्यापेक्षा सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हे असे कोणास समजाविण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक (०१) महिण्याच्या आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती लेखी स्वरुपात कळवाव्यात. आणि या लेखावरुन असे कळविण्यांत येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हकाबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबित दिसल्यास त्याला सदरहू मयाताचे Heirship certificate/पारस प्रमाणपत्र देईल. सदरचे जाहीर प्रगटन हे आज दिनांक ०६/०३/२०२४ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे. पुढील नेमलेली तारीख २०/०४/२०२४.

आदेशावरुन

(आर.टी. शिंदे) (व. लिपीक)

( एम. पी.नाईकवाडे) (सहायक अधिक्षक)

# महिला सक्षमीकरणासाठी युवकांनी पुढाकार घ्यावा- प्रा. भालेराव

उदगीर :- भारतीय संस्कृती महिलांचा खूप आदर करते. आपल्या अनेक देवता स्त्री आहेत आणि अनेक श्रद्धावान त्यांची देवता म्हणून पूजा करतात. स्त्री ही संपत्ती आणि शक्तीचे प्रतीक आहे त्यामूळे महिलाची समाजात महत्त्वाची भूमिका आहे. समाज, देश विकसित करायचा असेल तर महिलाचे सक्षमीकरण झाले पाहिजे. तिला कौटुंबिक,आर्थिक आणि सामाजिक निर्णय स्वतः घेण्यासाठी सहकार्य केले पाहिजे. त्यासाठी युवकांनी पुढाकार घ्यावा असे मत स्वामी विवेकानंद महाविद्यालयातील ग्रंथालय व माहितीशास्त्र विभागाच्या प्रा.संजीवनी भालेराव यांनी केले.



येथील स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळ संचलित स्वामी विवेकानंद महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना (एन एस एस) विभागाच्या वतीने आयोजित विशेष वार्षिक शिबीर दिनांक ०१ मार्च २०२४ ते ०७ मार्च २०२४ दरम्यान मौजे देवर्जन (हत्तीबेट),हणमंतवाडी ता. उदगीर येथे घेण्यात आले.या शिबिरातील दि. ४ मार्च रोजी बौद्धिक सत्रात महिला सक्षमीकरण आणि युवक या विषयावर ते बोलत होते. यावेळी व्यापीठावर रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. अमर तांदळे, वैष्णवी निटूरे यांच्या सह स्वयंसेवक उपस्थित होते.

# छ. शिवाजी महाराज चरित्र साधने प्रकाशन समितीच्या सदस्यपदी नळे, कदम

धाराशिव दि.१७ (प्रतिनिधी) - साहित्यिक, इतिहास व पुरातत्त्व संशोधक युवराज नळे व इतिहास तज्ञ डॉ सतीश कदम यांची महाराष्ट्र शासनाच्या छत्रपती शिवाजी महाराज चरित्र साधने प्रकाशन समितीवर करण्यात आली आहे. याबद्दल नळे व डॉ कदम यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार, आ राणाजगजितसिंह पाटील यांचे आभार मानले आहेत. या निवडीबद्दल आ. पाटील, जिल्हाध्यक्ष संताजी चालुक्य, माजी आमदार सुजितसिंह ठाकूर, बसवराज पाटील, लोकसभा प्रभारी नितीन काळे, दत्ता कुलकर्णी, यांच्यासह इतरांनी अभिनंदन केले आहे.

## वारसाचे प्रमाणपत्र मिळणेबाबत

मा.के.ए.पोवार,२रे सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर ,उदगीर यांचे न्यायालयासमोर

दिवाणी किरकोळअर्ज क्र.२०६/२०२४

निशाणी क्र.०७

ज्याअर्थी नामे Pralhad S/o Vitthalrao Patil ho R/0 Narsingwadi Lohra tq.udgir Dist Latur दि. ११/०४/ २०२३ रोजी at.Narsingwadi Lohra tq.udgir Dist Latur येथे मयत झाले आहेत. व अर्जदार

1) Dwarkabai W/o Pralhad Patil -ge--60,Occ.-H.H.
2) Chandrakala W /o Dilip Mehkare, -ge--40,Occu--H.H.
1,2 R/o Narsingwadi Lohra tq.udgir Dist Latur
3) Roopavati W/o Vasant Patil, -ge-38 -Occu--H.H.
R/o Haikher tq.-urad Dist Bidar
4) Govind S/o Pralhad Patil , -ge-36 -Occu--gri
R/o Narsingwadi Lohra tq.udgir Dist Latur
5) Gopal S /o Pralhad Patil , -ge-34 -Occu--gri
R/o Narsingwadi Lohra tq.udgir Dist Latur

खालिल नमुद पाच व्यक्ती हे मयताचे वारस असुन

1) Dwarkabai W/o Pralhad Patil -ge--60,--Wife
2) Chandrakala W /o Dilip Mehkare, -ge--40,--Daughter
3) Roopavati W/o Vasant Patil, -ge-38 --Daughter
4) Govind S/o Pralhad Patil , -ge-36 --Son
5) Gopal S /o Pralhad Patil , -ge-34 -Son

अर्जदार यांनी Pralhad S/o Vitthalrao Patil या नावाचे त्यांना मयताचे वारसाचे प्रमाणपत्र शासकिय व निमशासकिय कामासाठी लागणार असल्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

